# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price Rs. 3/-

# संवाद

॥ स्वयमेव मृगेंद्रता ॥

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥

Vol.-3 Issue - 6 डिसेंबर - २०१० December 2010


## संपादकीय

प्रिय सभासद मित्रांनो,

'संवाद'चा हा अंक आपल्या हातात पडेल तेव्हा ठाणे नगरीत '८४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' श्री. उत्तम कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलं असेल आणि त्यावरील कवित्व अर्थात चर्चा वादविवाद सर्व वृत्तपत्रांतून गाजत असतील. पुण्यनगरीत सन १८७८ मध्ये पहिलं संमेलन भरलं, त्याचे अध्यक्ष होते न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे. त्यावेळी ते 'ग्रंथकार संमेलन' म्हणून संबोधिले जाई. सन १९०७ मध्ये पुण्यातच भरलेल्या पाचव्या संमेलनापासून (तेव्हा प्रतिवर्षी संमेलन पार पडत नसल्याने त्या तीस वर्षात पाच संमेलने झाली) ग्रंथकार संमेलनाला 'साहित्य संमेलन' असं संबोधिलं जाऊ लागलं. पूर्वीचं साहित्य संमेलनाचं स्वरुप आता आमूलाग्र बदललेलं आपण अनुभवतो आहोत. पूर्वी काही शेकड्यात रुपये मोजून पार पडणाऱ्या संमेलनाने आता जणू कोटीच्या कोटी उड्डाणे घेतली आहेत. कोट्यवधी रुपयांचा अवाढव्य खर्च करीत सहस्त्रावधी प्रेक्षकांच्या उपस्थितीत आजकाल ही संमेलने पार पडू लागली आहेत.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमाऊलींच्या शब्दात सांगायचं तर हा 'अक्षरांचा मेळावा' असतो. आजचं साहित्य संमेलनाचं अर्थात् अक्षरांच्या मेळाव्याचं भव्य दिव्य स्वरुप पाहून आपल्या तोंडून देखील '.... आणि विस्मयाचिया जीवा। विस्मयो जाला।।' हे माऊलींचेच शब्द सहजपणे बाहेर पडतात.

सन १९६० मध्ये ठाण्यातच भरलेल्या बेचाळीसाव्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते, ज्येष्ठ समीक्षक व साहित्यिक रा. श्री. जोग. त्यांनी अध्यक्षपदावरून त्यावेळी मांडलेल्या 'लेखन-शुद्धी'च्या महत्त्वाच्या विचाराकडे लक्ष वेधावेसे वाटते. ते म्हणाले होते, ''मराठी नियतकालिकांनी लेखनशुद्धीचा स्वीकार करावयास पाहिजे असे विवेकी विचारवंतांस वाटू लागले आहे. ही लेखनशुद्धी म्हणजे लेखनातील संयम आणि सौजन्य या गोष्टी होत. मराठी वाङ्मयाच्या प्रारंभी ज्ञानेश्वरांनी याबाबत एक आदर्श घालून दिला होता. व्यवहारात ज्याप्रमाणे साधनशुचिता ही इष्ट असते तशी वाङ्मयातही लेखनशुचिता हीच इष्ट असावयास पाहिजे.'' हे विचार सदासर्वकाळ आदर्श व आचरणीय आहेत यात शंका नाही. आजच्या काळात तर त्यांची विशेष महती पटते. यावर अधिक भाष्य करण्याची मुळीच आवश्यकता नाही. असो.

साहित्यसम्राट आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या सुकन्या व त्यांचाच लेखनाचा वारसा पुढे चालविणाऱ्या सुप्रसिद्ध लेखिका शिरीष पै यांनी 'दुसऱ्या पिढीचे आत्मकथन' नावाचा प्रदीर्घ लेख लिहिला आहे. त्यात त्या स्वत:च्या लेखनाविषयी म्हणतात, ''मराठी वाचक-थोडेफार-माझे लेखन वाचतात. काहींना ते आवडते आणि ज्यांना ते खूप आवडते ते आपला अभिप्राय मला पत्रांनी कळवतात हे मी माझे भाग्य समजते. वाचकांची सुंदर पत्रे हे लेखकाला त्याच्या लेखनाबद्दल मिळालेले सर्वश्रेष्ठ पारितोषिक होय. इतर हजारो रुपयांच्या पारितोषिकांनी मिळणाऱ्या आनंदापेक्षा वाचकांना आपले लिखाण आवडते या जाणिवेमुळे होणाऱ्या आनंदाइतका महान आनंद लेखकाच्या दृष्टीने दुसरा नाही!'' आम्हाला येथे आणखी एका गोष्टीची आठवण होत आहे. जुन्या पिढीतील ज्येष्ठ साहित्यिक, कादंबरीकार प्रा.ना.सी.फडके हे 'अंजली' नावाचा दिवाळी अंक पूर्वी काढीत असत. त्यात त्यांची एक नवी कादंबरी प्रसिद्ध होई. प्रा.फडके त्या अंकात चक्क वाचकांची 'खुषी पत्रे' चौकटीत व ठळकपणे प्रसिद्ध करीत. वाचकांनी पाठविलेली प्रतिक्रियात्मक पत्रे काय किंवा दूरदूरहून आत्मीयतेने केलेले दूरध्वनी काय (कारण हे आजच्या काळातील संपर्काचं प्रभावी माध्यम आहे) हे सर्व सर्वश्रेष्ठ प्रमाणपत्रांप्रमाणेच आहे. 'संवाद'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या 'ज्ञानेश्वरांचे पसायदान' या अत्यंत गंभीर विषयावरील आमच्या लेखाच्या संदर्भातही आम्ही सध्या काही दिवस हाच सुखद अनुभव घेत होतो. त्यासाठी आम्ही सर्व सुहृदांचे अगदी मनापासून कृतज्ञ आहोत. कारण यामुळे आमच्या लेखनाचं नि लेखणीचं सार्थक झाल्याचं समाधान लाभून आमचा लेखनातील उत्साह-हुरूप टिकणार आहे. लवकरच कालपटावरून वर्ष २०१० सरून वर्ष २०११ला (म्हणजेच २१ व्या शतकातील दुसऱ्या दशकाला) प्रारंभ होत आहे. **नववर्षानिमित्त सर्वांना शुभेच्छा.**


– क्रांतिसेन रामचंद्र आठवले

भ्रमणध्वनी – ९८६९९४१६९१

## अभिनंदनीय

आपले नंदुरबार येथील सभासद श्री.राजेंद्रकुमार वाणी यांचा सुपुत्र चि.मेहुल हा बी.ई.(आय.टी.);एम.एस.(टेलिकॉम्युनिकेशन व सॉफ्टवेअर इंजि.) असून पुण्याच्या टेक महिंद्र या अग्रगण्य सॉफ्टवेअर कंपनीत सिनिअर टेक्निकल असोसिएट पदावर कार्यरत होता. त्यावेळी त्याची कंपनीने त्यांच्या अमेरिकेतील AT&T या सरकारी कंपनीच्या विशेष प्रोजेक्टसाठी निवड करून अमेरिकेत सप्टेंबर २०१० मध्ये ॲटलांटा येथे पाठविले आहे. नंदुरबारसारख्या अतिदुर्गम ग्रामीण भागातून आलेल्या चि.मेहुलची ही उत्तुंग भरारी विशेष कौतुकास्पद आहे. तसेच श्री.राजेंद्रकुमार वाणी यांचा धाकटा सुपुत्र चि.तन्मय हा सुद्धा पुणे येथील सिंहगड टेक्निकल इन्स्टिट्यूट मध्ये बी.ई (आय.टी.) च्या शेवटच्या वर्षात शिकत असून, गतवर्षी त्याची कॉलेज कॅंपस सिलेक्शन मधून ॲसेंचर या अग्रगण्य सॉफ्टवेअर कंपनीमध्ये जुलै २०१० मध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून निवड झाली आहे. वरील यशाबद्दल चि.मेहुल व चि.तन्मय या दोघांचे असोसिएशनतर्फे मन:पूर्वक अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालींसाठी शुभेच्छा.

**- सेक्रेटरी**

## स्टेट बॅंक पेन्शनर्स 'स्नेह मंडळ' पुणे

आपल्या सर्व सभासदांसाठी स्नेह मंडळातर्फे गुरूवार दि.१३ जानेवारी २०११ रोजी एक सुगम संगीताचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

सादरकर्ते : श्री.रावेतकर आणि त्यांचे सहकारी
स्थळ : 'निवारा' वृद्धाश्रम सभागृह,
एस.एम.जोशी सभागृहाजवळ,
सदाशिव पेठ, पुणे.
गुरूवार : दि. १३ जानेवारी २०११
वेळ : सायंकाळी ५ ते ८

सर्व सभासदांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे ही विनंती.

सेक्रेटरी, स्नेह मंडळ,पुणे

## दु:ख

वक्तशीर असावं माणसानं हे म्हणणं ठीक आहे हो. पण आपल्या वक्तशीरपणाचं कुणीतरी कौतुक करणारे तिथे पाहिजे ना. तिथे त्यावेळी कुणीच नसतं ह्याचंच दु:ख आहे.

**- मधु रानडे**

## अभिनंदनीय ! अनुकरणीय !!

नेहमीच हा अनुभव येतो की, बऱ्याच जणांना आपला निवृत्तीनंतरचा वेळ कसा घालवावा हे उमजत नाही. पण आपल्या अनेक उत्साही सदस्यांपैकी एक श्री.विनायक ना.ताम्हनकर (सांगली) यांना हा प्रश्न कधी पडलाच नाही. आपल्या असोसिएशनच्या कामाबरोबरच ते सांगली येथील त्यांच्या परिसरातील सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होत असतात. तसेच स्वत: कांहीं उपक्रमांचे आयोजन करत असतात. नुकतेच २१ नोव्हेंबर २०१० रोजी त्यांनी आपल्या स्थानिक मित्रांच्या सहकार्याने 'विद्यानगर हौसिंग सोसायटी दक्षता समिती'(सांगली)-सामाजिक व सांस्कृतिक मंचातर्फे एक रक्तदान, रक्तगट तपासणी व नेत्रदान संकल्प (शिबीर) सोहोळा आयोजित केला होता. त्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी २०० कुटुंबांशी (म्हणजेच जवळ-जवळ ८०० व्यक्तींशी) संपर्क साधून रक्तदान व नेत्रदान करण्याविषयी जागृती केली. परिणामत: ५४ व्यक्तींनी त्यादिवशी रक्तदान केले व रक्तगट तपासणी करून घेतली. तसेच ७२ व्यक्तींनी नेत्रदान करण्याविषयी संकल्प-पत्रें सादर केली. अर्थात 'शिरगावकर रक्तपेढी' व 'स्वामी स्वरूपानंद नेत्रालय व नेत्रपेढी' चे डॉ.भालचंद्र जोशी, डॉ.विवेक शिंदगी व सौ.वैजयंती शिंदगी व इतर सर्वच सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळेच हा सामाजिक उपक्रम यशस्वी होऊ शकला. विशेष म्हणजे श्री.ताम्हनकर यांनी हा कार्यक्रम त्यांच्या घरीच आयोजित केला होता. श्री.ताम्हनकर यांचे याबद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा!

- सेक्रेटरी

## प्रतिक्रिया

माननीय मा.का.बापट यांस,

आपण दरवर्षी माझ्या वाढदिवसाच्या शुभेच्छांचे भेटकार्ड मला त्याच दिवशी किंवा त्या अगोदरच मिळेल अशा पद्धतीने न चुकता पाठवता. माझा वाढदिवस बऱ्याच वेळेला माझ्या मिस्टरांच्याही लक्षात नसतो. पण तुमच्या ग्रीटिंगमुळे आता तेही लक्षात ठेवू लागले आहेत. आपण दरवर्षी एवढे आठवणीने ग्रीटिंग कार्ड पाठवता त्यामुळे मला जो काही आनंद मिळतो तो शब्दांत वर्णन करणे कठीण आहे. बॅंकेच्या सेवेत असतांना बॅंकेमुळे आम्हाला पैसा, घर, विमानातून प्रवास करण्याची संधी वगैरे अनेक फायदे मिळालेच. पण निवृत्तीनंतरही आपली असोसिएशन वाढदिवसाच्या शुभेच्छा न चुकता पाठवून आमच्या आनंदात भरच टाकते. त्याबद्दल बॅंकेचे, असोसिएशनचे व विशेषत: आपले मन:पूर्वक आभार !

- सौ.पल्लवी प्रकाश हजारे, अंधेरी,मुंबई-५८

# State Bank Of India Pensioners' Association Mumbai Circle, (Pune) Mumbai Zonal Sub-centre

A/5 Swami Siddharth CHS Ltd.
S.V.Road,Naupada,Thane 400602
Tel No. 25446837

**Dt : 10th December 2010**

## N O T I C E

The Managing Committee of the Mumbai Zonal Sub-Centre at its meeting held on the 9th November, 2010 has decided to hold the 24th Annual General Meeting of our Association's Mumbai Zonal Sub-Centre on Wednesday the 11th February, 2011 at 11.30 a.m. at the following address:-

**Shri Shivaji Mandir (Natya Gruha)**
**Opp. Plaza Theatre, N. C. Kelkar Path, Dadar (W) Mumbai 400 028**

## A G E N D A

1) To condole the deaths of Bank's Pensioners/Family Pensioners/ Associate Members whose names have been reported to us after the 20th February 2010. Members are requested to advise us the names and dates of death of members, if not in the list to be read at the time of AGM.
2) To confirm the minutes of the Annual General Meeting held on the 26th February 2010 (Minutes have been published in May 2010 issue of Samvad)
3) To honour senior members who have completed/will complete 75 years age between the 27th February 2010 to 11th February 2011 (both days inclusive).
4) Committee's Report for the year 2010 to be read, discussed and adopted (Committee's Report will be published in 'Samvad' issue for January 2011)
5) To discuss recent developments.
6) Speech of the Chief Guest.
7) Speech of the President.
8) Any other business with the permission of the Chair.

**By order of the Managing Committee**
**R. S. Rajiwadkar**
**Principal Secretary**

**Note :-**

i) Please bring a copy of "Samvad" issue for December 2010 and January 2011 along with you for security purpose.
ii) Please inform other members, known to you, about this meeting.
iii) The meeting of the Bank's Pensioners arranged by the Bank on the 11th February 2011 will start at 11.30 a.m. at the same venue. (Due to excigencies of services the timing may be changed.)
**Important :** As per our practice, a memorandum covering all the problems will be submitted to the management well in advance to enable them to study and reply in Bank's Meeting. Pensioners/ Family Pensioners are therefore, requested to furnish their problems to us in writing so as to reach say before 1/02/2011, so that a consolidated memorandum will be put up to the Bank Management to avoid direct questions/discussion with the management representatives in the meeting. This is to adhere to the time schedule.
iv) Snacks will be served on the 3rd Floor of the building as usual.
v) All seats in 'A' to 'C' rows are reserved for special invitees. Members are requested to please occupy other seats.

**मित्रहो,**

तुमच्याजवळ बरेच दिवस काहीतरी गोष्टी कराव्यात असे वाटत होते परंतु विषयच इतका गहन व विचार करण्यासारखा होता की, नागपूर झोनल सब सेंटरची इलेक्शन झाल्यावर सुध्दा हा विषय तुमच्याजवळ कसा मांडावा याचा मी विचार करत होतो व शक्यतो तुम्हाला काही अप्रिय गोष्टी सांगण्याचे टाळत होतो त्याबद्दल प्रथमत: क्षमस्व.

जरी मी व कार्यकारी मंडळाच्या कुठल्याही सभासदाने ह्या विषयाला वाचा फोडली नाही तरी आपले भूतपूर्व अध्यक्ष श्री. एन्.एस. कुलकर्णी यानी आपल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत १२ जुलै २०१० ला पुण्याला त्या विषयाला वाचा फोडली व मला त्यांना उत्तर देण्यासाठी माझे मौन सोडावे लागले व आपले माननीय सभासद व लाडके नेते श्री. एकनाथ ठाकूर यांनी असोसिएशनला नागपूरला दिलेल्या देणगीबद्दल खरी परिस्थिती काय आहे याबद्दल थोडक्यांत त्याचा इतिहास व सद्यस्थिती सांगावी लागली. कारण या वेळच्या आपल्या ताळेबंदात आम्ही ती रक्कम रु.१,११,१११/- श्री. ठाकूर यांनी दिलेली देणगी म्हणून दाखविली आहे. श्री. कुलकर्णींचे मनांत ती रक्कम असोसिएशनच्या ताब्यांत आल्याबद्दल फारसा आनंद नव्हता असे दिसते. पण त्यांना काळजी पडलेली आहे की, या प्रकरणात आपण नागपूरच्या काही मुखंडांना दूर लोटलेले आहे. तेव्हा मला आता तुमच्यापुढे व विशेषत: नागपूर झोनच्या सर्व सभासदांना काही गोष्टी सांगण्याशिवाय प्रत्यवाय नाही म्हणून हे विवेचन.

तुम्हाला ऐकून आश्चर्य वाटेल की, श्री. एकनाथ ठाकूर यांनी ३-२-२००६ च्या त्यांच्या पत्रासोबत एका चेकने रु.१११,१११/- देणगी 'स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन, नागपूर झोनल सब सेंटर' या नावे A/c payee चेक काढून दिली व त्या देणगीचा वापर विदर्भातील पेन्शनर्स असोसिएशनचे जे सभासद चांगले काम करतात, त्यांना बक्षिस देण्यासाठी करावा व त्या बक्षिसाला "N.G. More Service Award" असे नाव द्यावे असे लेखी कळविले. ठाकुरांच्या ३-२-२००६च्या पत्राची कॉपी, चेकची कॉपी व नागपूर झोनल असोसिएशनने त्याना २०-२-२००६ रोजी पाठविलेल्या पत्राच्या प्रति सोबत छापल्या आहेत.(Annexure - 1, 2 & 3) त्यावरून आपल्या लक्षात येईल की, देणगी असोसिएशनला दिली होती व तिची पोच असोसिएशनचे तेव्हांचे अध्यक्ष व सचिव यांनी श्री. ठाकूर यांना दिली होती. इथे एक गोष्ट नमूद करणे जरूर आहे की, सर्कल असोसिएशनचे पुणे हेड ऑफिस व सर्कल अध्यक्षांना या देणगीबद्दल काहीहि माहिती नव्हते. जेव्हा नागपूर विभागातल्या चांगल्या कार्य करणाऱ्या सभासदाला बक्षिस देण्यासाठी काही मजकूर छापण्याची विनंती नागपूर झोनच्या सेक्रेटरीने श्री. लळिंगकर, सचिव, सर्कल असोसिएशन, यांचेकडे केली (Annexure - 4). तेव्हा सेक्रेटरीने माझ्याकडे हा मजकूर संवाद मध्ये छापण्याबद्दल परवानगी मागितली. मी त्यांना विचारले की, हे बक्षिस कोणी sponsor केलेले आहे व झोनल सबसेंटरचा त्यांच्याशी काय संबंध आहे? सेक्रेटरीने नागपूर ऑफिसकडे याबद्दल चौकशी केली तेव्हा त्यांना असे सांगण्यात आले की, या बक्षिसाशी झोनल सबसेंटरचा कांही संबंध नाही, पण हे बक्षिस नागपूर क्लबतर्फे श्री. ठाकूर साहेबांनी क्लबला दिलेल्या देणगीतून दिले जात आहे. सर्कल असोसिएशनचा "नागपूर क्लब"शी काही संबंध नसल्यामुळे तो मजकूर संवादमध्ये छापण्याला मी संमति दिली.

मध्यंतरी वर लिहिल्याप्रमाणे जुलै २००७ मध्ये (As per Annexure - 5) खालील लोकांना "N.G.More Service Award" ची बक्षिसे देण्यात आली.

१. श्री. सी.एन्. वाझिरानी, नागपूर विभाग रु. ४०००/-

२. श्री. एन्.एस्. नागराज, अकोला आणि श्री. एस्.जी. हमिने, यवतमाळ यांना सामाईक वाटून (नागपूर सोडून विदर्भ भागासाठी) रु. ४०००/-

आपल्या एक गोष्ट लक्षांत आली असेल की, श्री. जयंत वकील की, जे नागपूर झोनचा सर्व व्यवहार अतिशय व्यवस्थित व कुशलतेने चालवत होते, त्यांना बक्षिस देण्याच्या पध्दतीने डावलण्यांत आले होते. त्यामुळे कदाचित् ते दुखावले असतील. बक्षिसाबद्दलची नोटीस (Annexure - 4) व श्री. एकनाथ ठाकूर यांना लिहिलेले १४-७-२००७ चे पत्र (Annexure - 5) छापले आहे. अर्थात बक्षिसाचा सर्व व्यवहार व निर्णय हा क्लब व नागपूरच्या सिलेक्शन कमिटीने की, ज्यामध्ये नागपूर झोनल असोसिएशनच्या ॲडव्हायसरी कमिटीचे सभासद होते, त्यांनी घेतलेले होते त्यामुळे सर्कल असोसिएशनने त्यात लक्ष घालण्याचा प्रश्नच नव्हता.

मला वाटते की, वर घेतलेल्या बक्षिसांच्या निर्णयानंतर श्री. वकील व नागपूर झोनचे इतर कार्यकारिणी सदस्य व ॲडव्हायसरी! कमिटीचे सदस्य यांचेमध्ये तणाव उत्पन्न होऊ लागला व त्याची परिणती १८ नोव्हेंबर २००७ च्या नागपूर झोनच्या बैठकीत श्री. वकील यांना सचिव पदावरून काढण्यांत झाली. या संबंधात श्री. औरंगाबादकर यांनी मला एक पत्र पाठविले. त्यात त्यांनी असे म्हटले कीं, गेल्या २५ वर्षात नागपूर झोनमध्ये सबंध विदर्भाची अशी कधीहि निवडणूक झाली नव्हती. याचा अर्थ असा होतो की, इलेक्शन फक्त नागपूर

शहराच्या लोकांमधून करून सबंध विदर्भाच्या ११ जिल्ह्यांच्या सभासदांवर ही कार्यकारिणी थोपली जात असे. म्हणून सर्कल कमिटीने नागपूर झोनल कमिटीचा श्री. वकील यांना पदावरून दूर करण्याचा निर्णय रद्दबादल ठरविला व नव्याने निवडणूक घेऊन ऑक्टोबर २००८ ला नविन कार्यकारिणीकडे कारभार सुपुर्द केला व तो आता व्यवस्थित चालू आहे. एवढे सगळे लोकशाहीचे रामायण होऊन सुध्दा नागपूर शहरांतील कांही मूठभर लोकांच्या की, जे निवडून येऊनसुध्दा काही काम करीत नाहीत व काही जे पराभवाने खचून गेलेले आहेत, अशांना हा निर्णय पचनी पडलेला नाही व ते सभासद नागपूरला अध्यक्ष व सचिव यांनी बोलावलेल्या सभेमध्ये गोंधळ घालून असोसिएशनची प्रतिमा खराब करीत आहेत. सर्कल असोसिएशनकडे असा गोंधळ करणाऱ्या व गैरवर्तन करणाऱ्या सभासदांचे पुरावे आहेत व त्याचा सविस्तर विचार करून सर्कल कमिटी अशा सभासदांवर काय कारवाई करता येईल याचा अभ्यास करून लवकरच योग्य तो निर्णय घेईल. मला हे तुम्हाला सांगावेसे का वाटले की, आपण सर्व ज्येष्ठ नागरिक असून अजूनहि परिस्थितीशी जुळवून घ्यायला शिकलो नाही व आपली वागणूक निवृत्त झाल्यावर सुध्दा अजूनहि पोरकटपणाचीच आहे असे वाटते.

नंतर जानेवारी/फेब्रुवारी २००९ मध्ये सर्कल असोसिएशनला सध्याचे सचिव श्री. जयंत वकील की, जे नागपूर झोनचे पूर्वी ५ वर्षे सचिव होते व नागपूर क्लबचे सुध्दा सचिव होते, यांनी श्री. एकनाथ ठाकूर यांनी वर निर्देश केलेले पत्र, त्यांनी देणगी दिलेला चेक व श्री. ठाकूरांना असोसिएशनने दिलेली पोच यांच्या कॉपीज पाठविल्या व आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण तो पत्र व्यवहार वाचून मी व श्री. बाळासाहेब दांडेकर गोंधळून गेलो व असोसिएशनच्या नावावर असलेला चेक असोसिएशनच्या खात्याला कसा जमा झाला नाही याची चौकशी पुणे हेड ऑफिसला केली व श्री. जयंत वकीलना याबद्दल स्पष्टीकरण देण्यास सांगितले त्यांनी जे आम्हाला सांगितले त्यामुळे आम्हाला धक्काच बसला व ताबडतोब एस.बी.आय.पेन्शनर्स क्लब, नागपूर व श्री. एन्.जी. मोरे, ज्यांच्या तर्फे हा चेक नागपूरला आला, यांच्याकडे चौकशी केली पण आम्हाला काहीच पत्ता लागला नाही. नंतर श्री. जयंत वकील यांनी आम्हाला सांगितले की, जरी तो चेक असोसिएशनचे नावावर व A/c payee होता तरी नागपूरचे इतर पदाधिकारी व सिनियर ऑफिसर्स यांनी श्री. वकील यांच्यावर दबाव आणून त्यांच्या मनाविरूध्द तो नागपूर क्लबचे खात्यात जमा करायला लावला व पुढे त्या पैशातूनच पेन्शनर सभासदांना बक्षिसे वगैरे वाटण्याचा कार्यक्रम क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी केला. ही माहिती आम्हाला मिळताच आम्ही क्लबचे त्यावेळचे पदाधिकारी विशेषत: श्री. अशोक पात्रीकर व श्री. एन्. जी. मोरे यांना लगेच व्यक्तीश: भेटून त्यांना आपले वजन खर्च करून पैसे सामोपचाराने पेन्शनर असोसिएशनचे अकाउंट मध्ये जमा करावे अशी विनंती केली. त्यासाठी मी स्वत:, श्री. बाळासाहेब दांडेकर व सचिव श्री. लळिंगकर, श्री. मोरे यांना एकदा चेंबूर, मुंबई येथे व एकदा त्यांचे नागपूर येथील घरी भेटलो. पण मोरे यांनी आम्हाला मदत करण्यास असमर्थता दाखविली व नागपूरच्या लोकांच्या मनांत असोसिएशन हेड क्वार्टर्सबद्दल विश्वास नाही व श्री. ठाकुर यांनी दिलेल्या रकमेचा योग्य वापर होईल की नाही याबद्दल संशय आहे असे वाटते असे सांगितले. आता सभासदांनीच याबद्दल आपले मत बनवावे. कारण चेक असोसिएशनचे नावांवर असताना, प्रथम तो बेकायदेशीररित्या दुसऱ्या अकाउंटला जमा करणे व नंतर ते पैसे असोसिएशनकडून बरोबर वापरले जातील का नाही याबद्दल संशय व्यक्त करणे म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा झाल्या. खरं तर श्री. मोरे यांनी आम्हाला जे लोकांचे मत म्हणून सांगितले ते खरे तर त्यांचेच स्वत:चे मत होते असे दिसते. हे आपल्याला त्यांच्या श्री. दांडेकर यांना लिहिलेल्या ९.१२.२००८ चे पत्रातून खालील परिच्छेदामधून लक्षात येईल.

Extract -“I am doubtful of what will happen to the funds donated by Shri E.K. Thakur to Nagpur Sub Centre as a gesture of goodwill and his love and affection of pensioners of Vidarbha area”.

परिस्थिती या थराला आल्यावर आम्हाला रामदास पेठ शाखेच्या मॅनेजरना भेटून असोसिएशनचे पैसे असोसिएशन खात्याला जमा करावी अशी विनंती करण्याशिवाय मार्गच राहिला नाही. तेव्हा आम्ही दुसऱ्या काही कामासाठी नागपूरला गेलो असता प्रश्न सामोपचाराने मिटवून टाकावा व कोणाला त्रास होऊ नये म्हणून तारीख २४-३-२००९ रोजी बँकेला एक पत्र दिले. (Annexure - 6) हे पत्र दिल्यावरसुध्दा व Reminder पाठवूनसुध्दा काही उपयोग न झाल्यामुळे असोसिएशनपुढे CGM वगैरे मोठ्या अधिकाऱ्यांना पत्र लिहिण्यावाचून मार्गच राहिला नाही. म्हणून आम्ही आमचे पत्र नं. पी-३१ तारीख ११-०१-२०१० रोजी चीफ जनरल मॅनेजर स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई हेड ऑफिस (Annexure - 7) यांचेकडे पाठवून रीतसर तक्रार केली व त्यांच्या सहकार्यामुळे बँकेच्या ११-२-२०१० च्या पत्राद्वारे श्री. ठाकूर साहेबांनी दिलेल्या देणगीचे पैसे व्याजासहित असोसिएशनचे खात्याला जमा केल्याची सुवार्ता आम्हाला कळविण्यांत आली. परंतु सभासदांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, श्री. ठाकुर साहेबांनी मोठ्या प्रेमाने दिलेल्या देणगीचे पैसे असोसिएशनचे खात्याला जमा होण्यास बरोबर ४ वर्षे लागली. याचे कारण नागपूर क्लबचे पदाधिकारी व त्याना बळ देणारे सिनीयर ऑफिसर्स या मूठभर लोकांनी असोसिएशनच्या सामान्य सभासदांना वेठीला धरून हे दिवसाढवळ्या दरोडा घालण्याचे दुष्कृत्य केले व श्री. ठाकुर साहेब व असोसिएशनला

धोका दिला. पुढील दोन पत्रे वाचल्यावर आपल्या लक्षात येईल की, अजूनहि नागपूर क्लबचे पदाधिकारी व त्याना पाठिंबा देणारे काही मूठभर लोक हे पैसे क्लबच्या मालकीचे आहेत असे म्हणतात.(Encl - 8 : Ramdas Peth Br. Letter No. CM-2009/17 dated 9.1.2010 and Encl - 9 : SBI Pensioners Club Nagpur Club letter No. SBI-PCN-36/2009 dated 10-12-2009.) म्हणून नागपूर शहरात स्थाईक असलेल्या तसेच विदर्भात अन्यत्र रहात असलेल्या सर्व सभासदांस विनंती की त्यांनी देणग्या देताना चेक असोसिएशन्च्याच नावाने काढावेत व असे चेक झोनल सेक्रेटरीकडे पाठवून योग्य ती पावती मागावी.

म्हणून, माझी विशेषत: नागपूरच्या सभासदांना कळकळीची विनंती आहे की, त्यानी त्यांच्या पुढील वाटचालीत अपप्रवृत्ती असलेल्या व संस्थेच्या कारभारांत गोंधळ माजविणाऱ्या सभासदांपासून चार पावले दूर रहावे व आपले प्रतिनिधी योग्य प्रकारे निवडावेत.

या सर्व प्रकरणाची श्री. एकनाथ ठाकूर यांना मी पत्र लिहून पूर्ण कल्पना दिलेली आहे. तसेच सदर पत्राची कॉपी याच अंकात छापलेली आहे. (Annexure - 10)

आपला विश्वासू
अध्यक्ष
वि.मो. गोखले

Encls : as above

*************************************************************************************************

**Annexure - 1**

**Ekanath K. Thakur**
Member of parliament
Rajya Sabha
***Member :***
*Standing Committee - Information Technology*
*Consultative Committee - Commerce*

B-503, M.S. Flats,
Baba Kharak Singh Marg,
Opp. Ram Manohar Lohia Hospital,
New Delhi - 110001
Tel : 011 - 23355277
Tel - Fax : 011 - 23323632

**Ref. No.**: EKT/588/2006

3rd February 2006.

My dear Shri. Jayantrao Vakil,

Thank you very much for your letter of the 2nd January 2006. Generally, I remain out of Mumbai for Maharashtra Chamber, Saraswat Bank and Parliamentary work. Hence the delay in my reply, for which I hope to be forgiven.

I am indebted to you, Shri. Eknathji Kalbhande and all my colleagues for the very generous and whole-hearted reception to me. I was indeed very happy to see all my old colleagues in the Bank and being able to talk them. Please accept my sincere gratitude.

During my speech, I had proposed an Award in honour of my first boss in the Bank Shri.N.G.More, who has been an elder brother to me for last forty years. The Award is to be named "N.G.More Service Award" and is to be given every year to a pensioner, whose services to other pensioners and Pensioners' Association are considered "invaluable". The amount of the Award is to be decided by the Association. I now enclose my cheque for Rs.1,11,111/- (Rupees One lakh eleven thousand one hundred eleven only) as promised towards corpus for this N.G.More Award. I do not need to consent of esteemed Shri.More because I am his family member in this life and I have as much social right over him, I believe, as his other family members. Please accept and acknowledge and kindly let the Association establish the Award from 2006 onward.


I will definitely come over and meet you with Shri.More, Shri.Kalbandhe and Shri.Rambhau when I come to Nagpur next.

With warm personal regards and thanking you once again.

Yours sincerely,
Sd/-
(Ekanath K. Thakur)

Encl.:Cheque bearing No.979320 dt.3/2/2006 on SBI New Delhi.

Annexure - 2




******************************************************************************

Annexure - 3

**State Bank of India Pensioners' Association, (Mumbai Circle)**

NAGPUR ZONAL SUB-CENTRE

Regd. Office :
Vakil's Bungalow,
Congress Nagar,
Nagpur - 12

Ref. No. JSV 150

Date : 20-02-2006

Respectfully Dear Shri. Thakursaheb,

We thankfully acknowledge receipt of your letter No.EKT/588/2006 of the 3rd Feb. 2006 enclosing therewith a Chq. for Rs.1,11,111/- in the name of State Bank of India Pensioner Association Nagpur Zone Centre.

The letter and cheque has been received through Shri.Nanasaheb More.

As desired by you the amount of the cheque will be held by the Association in the corpus named "Shri.N.G.More Service Award".

Thank you for your generous donation towards our Association.

Yours faithfully,

Sd/- Sd/-

1) E.D.kalbande 2) J.S.Vakil

Annexure - 4

# स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन, मुंबई सर्कल - पुणे

## विभागीय उपकेंद्र - नागपूर

कार्यालयीन पत्ता : **वकीलांचा बंगला**
काँग्रेस नगर,नागपूर - १२

**एन.जी.मोरे सर्व्हिस अवॉर्ड**

आपणास माहितच आहे की माननीय श्री.एकनाथ के.ठाकूर, एम.पी.(राज्यसभा) ह्यांनी दिलेल्या देणगीच्या (रु.१,११,१११/-) उत्पन्नातून त्यांनी प्रदर्शित केलेल्या इच्छेप्रमाणे एन.जी.मोरे सर्व्हिस अवॉर्ड स्थापन करण्यात आले आहे. हे बक्षीस विदर्भातील ज्या सभासदाची सेवा इतर पेन्शनर व वरील संस्थेविषयी बहुमुल्य राहिल त्याला देण्यात येईल. हे बक्षीस दरवर्षी कॅश मध्ये राहील व २००६-२००७ ला प्रथम देण्यात येईल. तसेच हे बक्षीस विभागून नागपूर करता एक व विदर्भातील इतर जिल्ह्यांकरता एक असे राहिल.

**बक्षीसाविषयी माहिती व पात्रता**

१) नागपूर विभागाकरता एक रु. ४०००/-
विदर्भातील इतर जिल्ह्यांकरता एक रु.४०००/-
२) ज्या पेन्शनर सभासदांना स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर असो. मुंबई सर्कल ह्या संस्थेविषयी वि?ास व आदर आहे.
३) मासिक / त्रैमासिक सभेत उपस्थिती
४) नवीन मेंबर्स करणे - महत्व जास्त करून जुन्या पेन्शनरांना सभासद करणाऱ्याला देण्यात येईल.
५) सभासदांच्या समस्या सोडवण्याकरता बँक व पेन्शनर सभासदांमध्ये दुवा बनणे.
६) आपसात सद्भावना वाढवणे.
७) सभासदांना योग्य माहिती पुरवणे व प्रबोधन करणे.
८) सभासदांच्या अंगच्या गुणांचा विकास व्हावा म्हणून संबंधितांना उत्तेजन देणे.
९) बक्षिसाचा काळ १ एप्रिल ते ३१ मार्च दरवर्षी राहिल.
१०) पेन्शनरप्रति सेवेचा काळ मागील तीन वर्षाचा राहिल.

आपला कृपाभिलाषी
जयंत वकील सचिव

**निवड समिती**

वाय.एस.औरंगाबादकर; एन.जी.मोरे; एस.डी.पारनंदिवार; जी.एम.भाके; इ.डी.काळबांधे;

---

Annexure - 5

## State Bank of India Pensioners' Association, (Mumbai Circle)

NAGPUR ZONAL SUB-CENTRE

Regd. Office :
Vakil's Bungalow,
Congress Nagar, Nagpur-12

Ref. No. JSV-18 Date : 14-7-2007

To,
Hon. Shri. Eknathji Thakur
Member of Parliament Rajya Sabha, New Delhi.
Respected Sir,

**N.G.More Service Award 2006 - 2007**

We are pleased to inform you that the above Award was established as per your desire expressed in your letter dt. the 3rd Feb.2006 and first such Award was to be declared by June 07.

We are glad to inform you that the results for Award 2006-2007 were declared by our selection committee constituted by Sarvashri Y.S.Aurangabadkar, S.D.Parnandiwar, N.G.More, G.M.Bhake and E.D.Kalbandhe and the names of the winners are furnished hereunder.

1) Mr. C.N.Vazirani - Sole Winner from Nagpur
2) Mr. N.S.Nagraj, Akola } - Prize distributed as both secured equal marks
3) Mr. S.G.Hamine, Yavatmal }

We are confident that this kind of encouragement initiated by you certainly provide necessary stimulus to deserving members of the Association to give their invaluable services/support to other pensioners in general and pensioners Association in particular.

Thanking you,

Yours faithfully,
J.S.Vakil, Secretary

Annexure - 6

**State Bank of India Pensioners' Association, (Mumbai Circle)**

NAGPUR ZONAL SUB-CENTRE

**Camp - Nagpur**

Office :
Vakil's Bungalow,
Congress Nagar, Nagpur-12

Ref. No.

Date : March 24, 2009

The Chief Manager,
State Bank of India,
Ramdaspeth Branch,
Nagpur.

Dear Sir,

**Subject : State Bank of India Pensioners' Association, (Mumbai Circle) Pune, Nagpur Zonal Sub-Centre Account No.11072617609 with you**

We refer to the meeting the undersigned had with you today, when the following office bearers of the Circle/ Zonal Association were also present.

a) Shri.P.M.Narkar - Vice President of the Circle
b) Shri.R.N.Lalingkar - General Secretary of the Circle
c) Shri.B.G.Dandekar - Advisor to the Federation
d) Shri.S.G.Desai - President of the Zonal sub centre, Nagpur.

2. We had handed over to you Xerox copies of the following papers.

a) Letter No.JSV/20 dated 20th February 2006 signed by Late Shri.E.D.Kalbandhe, the then President of the Nagpur Zonal sub-centre and Shri.J.S.Vakil, the then as Secretary of the Nagpur Zonal Sub-Centre.
b) Cheque No.979320 dated the 3rd February 2006 issued by Shri.E.K.Thakur in favour of State Bank of India Pensioners' Association Nagpur Zonal Sub-centre for Rs.1,11,111/-.

3. We enquired of you about the disposal of the amount of the Cheque. On enquiry, your branch record showed that instead of crediting the amount of Cheque to the Pensioners' Association Account, a Special Term Deposit having account No.30156009456 dated the 30th March 2007 had been issued favouring State Bank of India Pensioners' Club for Rs.1.11.000/- inadvertently. As the Cheque was issued by Shri.E.K.Thakur favouring State Bank of India Pensioners' Association, the mandate has not been carried out correctly.

4. We, therefore, request you now to regularize the position by changing the name of the beneficiary of the STDR from the present name to the name of the State Bank of India Pensioners' Association, Nagpur Zonal sub-centre. If threr is any technical difficulty in making the above change, a fress STDR may be issued in the name of the State Bank of India Pensioners' Association Nagpur Zonal sub-centre retrospectively with the same Terms and Conditions.

Yours faithfully,
V.M.Gokhale
President,
SBI Pensioners Association (Mumbai Circle) Pune
Camp : Nagpur

We agree with the above instructions.

| | |
|---|---|
| Sd/- | Sd/- |
| J.S.Vakil | S.G.Desai |
| Secretary | President |
| SBI Pensioners' Association | SBI Pensioners' Association |
| Nagpur Zonal sub-centre | Nagpur Zonal sub-centre |

**Annexure - 7**

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION**
**(MUMBAI CIRCLE) PUNE**
'Anubandh', Bldg.No.B-2,4th Floor,Block - 16
Nr Ramkrishna Math, Sinhagad Road,
Pune - 411030; Ph.24332141

**MUMBAI SUB CENTRE**
A-5, Swami Siddarth CHS.,
S.V.Road, naupada, Thane - 400602
Ph.25446837

No.P-31 Date : 11/01/2010

The Chief General Manager
State Bank of India
Mumbai Local Head Office,
Bandra-Kurla Complex
Bandra, Mumbai

Dear Sir,

**FRAUD**

**State Bank of India pensioners' Association, Mumbai Circle, Pune Zonal Sub-Centre, Nagpur Savings Bank A/c No.11072617609 with SBI Ramdas Peth Branch, Nagpur**

We regret to bring your notice a fraud committed by our Ramdas Peth Branch and also certain irregular practices followed by them for a very long time of crediting the cheques/amounts meant for the credit of our Nagpur Zonal Sub-centre A/c to the account of SBI Pensioners' Club Nagpur.

2) The short particulars of the fraud are as under. A cheque No.979320 dated the 3rd February 2006 issued by Shri.E.K.Thakur, our ex-employee and Ex Rajya Sabha Member in favour of State Bank of India Pensioners' Association, Nagpur Zonal Sub-centre was wrongly credited to the SB A/c No.11072617597 standing in the name of State Bank of India Pensioners' Club Nagpur. Thinking that this was a bonafide error due to similarity in the name of the A/c, we took up the matter on the 24th March 2009, (with the then Branch Manager Shri.Bhalerao). In this connection we enclose copies of the following communications the contents of which are self explicit.

(a) Copy of our letter dated the 24th March 2009 addressed to our Ramdas Peth Branch

(b) Copy of our letter dated the 26th June 2009 addressed to AGM (Admn) Zonal Office, Nagpur

(c) Copy of our letter dated the 20th November 2009 addressed to our Ramdas Peth Branch

(d) Copy of letter dated 26-11-2009 written by the Branch to Nagpur Club

(e) Copy of letter dated the 15th December 2009 written by Branch to our Nagpur Zonal Sub-centre

3) You will observe from the correspondence that we have done everything in our powers to request the Bank to restore the amount of Rs.1,11,111/- to our SB A/c. We are, however, getting an impression that the Branch Staff is hand in glove with the office bearers of the Nagpur Club and are, therefore, not only restoring the credit to our A/c but not even replying our communications. You will agree that the position is far from satisfactory and needs your intervention. It will not be out of place to mention that the Association is a valuable depositor of the Bank and our deposits with SBI maintained at our Vakola (Santacruz, Mumbai) and Dattawadi (PUNE), branches aggregate about Rs. 80 lacs.

4) We therefore request you to kindly look into the matter and

(a) Restore the amount of Rs.1,11,111/- wrongly credited to the A/c of SBI Pensioners' Club Nagpur with interest.

(b) Appoint an investigation official to verify the transactions in the SBI Pensioners' Club A/c for last 5 years and restore the wrong credits given to that A/c but actually meant for SBI Pensioners' Association, Nagpur Zonal Sub-centre A/c with intrest.

(c) Consider taking suitable disciplinary action against the concerned staff for dereliction of duty, particularly the Branch Managers at the material time.

(d) Transferring the A/cs of the Club to some other branch in Nagpur City to avoid recurrence of such instances.

(e) As the TDR matures on the 30th March 2010 we request you not to pay the maturity amount to the Club but hold it with the Branch till a decision is taken by the Bank to restore the amount to us, if the amount is not refunded to us by the Bank by that date.

Thanking you and awaiting your favourable responses.

Yours faithfully,
V.M.Gokhale
President

**Annexure - 8**

**STATE BANK OF INDIA**
**RAMDAS PETH (1633) BRANCH**
**NAGPUR - 440012**
CM/2009/17

To,
State Bank of India Pensioners Association,
(Mumbai Circle), Pune - Nagpur Zonal Sub Centre
Vakil's Bunglow, Congress Nagar, Nagpur - 12

09/01/2010

Dear Sir,

**Wrong Credit & Issue of TDR/STDR for Rs.1,11,000/- in Name of Pensioners Club**

With reference to your claim of wrong credit and issue of TDR/STDR for Rs.1,11,000/- in the name of SBI Pensioners Club, we have to advise as under.

We have persuaded the matter with SBI Pensioners Club BG/4, Indranil Apartment, Rahate Colony, Wardha Road, Nagpur-22.

Further, SBI Pensioners Club has claimed the ownership of the deposit, the copy of the reply is enclosed for your perusal.

Hence we are unabkle to redress your grievances as the fund is owned by the SBI Pensioners Club.

Yours faithfully,
Sd/-
Sunil Kumar
Chief Manager

Copy to, The Assistant General Manager, State Bank of India, Administrative Office, Region-I, Nagpur

***************************************************************

**Annexure - 9**

**STATE BANK OF INDIA**
**PENSIONERS' CLUB - NAGPUR**

Add : Shri. S.Y.Ghanekar, Bg 4, Indranil Apartment, Rahate Colony, Wardha Road, Nagpur - 440022

To,
The Chief Manager
State Bank of India,
Ramdas Peth, Nagpur

10th Dec 2009
No.:SBI/PCN/36/2009

Dear Sir,

**Sub : Wrong Credit and Issue Dt TDR/STDR for Rs.1,11,000/- in the Name of SBI Pensioners Instead of SBI Pensioners Association Dt.27/03/2006**

We invite your kind attention to our letter no. SBI/Pen/30/2009 dated 12/10/2009 and according to para 5, we have requested your honour to kindly submit the Xerox copies of some important vouchers/instruments etc. to enable us to help you in settlement of the deposit. Instead you have sent a letter no.CM/2009/290 dated 26th Nov.2009. There from we observe that the reply submitted by you is incomplete & overlooking of the facts and more likely as the spokeperson of Association.

We also observe that the branch is under dilemna of ownership of funds which is unwarranted at this stage.

As per Xerox copy of credit voucher provided by you we observe that Branch has acted as per mandate given by depositor at the material time. Hence we confirm that funds under reference undoubtedly belong to SBI Pensioners' Club only.

We reiterate that any act of diverting the club funds under reference will be treated as coercion.

Thanking you,
Yours faithfully,
Sd/-
Secretary
(S.Y.Ghanekar)

Annexure - 10

**MUMBAI SUB CENTRE**

A-5, Swami Siddarth CHS.,
S.V.Road, Naupada, Thane - 400602

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION**
**(MUMBAI CIRCLE) PUNE**
'Anubandh', Bldg.No.B-2,4th Floor,Block - 16
Nr Ramkrishna Math, Sinhagad Road,
Pune - 411030; Ph.24332141

No. P - 51 Date : 09/04/2010

My dear Thakur,

**Your Donation of Rs. 1,11,111/- to the State Bank of India Pensioners' Association's Nagpur Zonal Sub Centre**

You will be surprised to receive a letter from me on the above subject after a period of virtually 4 years when you donated the above amount to the Nagpur Zonal sub-centre of the Pensioners' Association with a noble purpose. As the amount was donated by you to our Nagpur Zonal sub-centre with clear instructions in your letter as regards the utilization of the amount, the said amount should have been credited to the Central pool of the Circle Association with your disposal instructions to do the needful.

However instead of following your instructions in letter and spirit, certain misguided people in Nagpur which unfortunately includes great Shri.N.G.More appears to have decided to go against your wishes and mandate and obviously pressurized the Ramdas Peth Branch of the Bank to credit the amount of your cheque to the account of SBI Nagpur Club although the cheque was clearly drawn by you fvg. SBI Pensioners' Association, Nagpur Zonal sub-centre.

As the donation was not within our knowledge, there was no question of the Circle Association raising any dispute with the Ramdas Peth Branch. The fact of your donation was brought to our notice by the then Secretary of the Zonal sub-centre Shri.J.S.Vakil only in January/February 2009 and then we took up the matter with our Ramdas Peth Branch vide our letter dated the 24th March 2009. As the branch was not restoring the amount to our A/c even after repeated reminders, we were left with no alternative but to take up the matter with the Circle CGM strongly vide our letter No.P-31 dated the 11th January 2010 (copy enclosed for your information along with enclosures). It will not be out of context to mention in this regards that all attempts made by me and Shri.B.G.Dandekar to restore the amount to the Association by meeting the office-bearers of the Club as also Shri.N.G.More had failed. In fact we have some how found that during last 2/3 years Nagpur city people have been following confrontationist approach with the Circle Association as could be observed by you from some of the copies of the communications attached by us to this letter.

We have no intention of what so ever to bother you with petty problems when you are busy with your 'Ashvamedh Yagnya' of opening branches but we wanted you to know how foolishly Nagpur friends are behaving as we reliably understand that they have approached you and apprised you of the matter.

We of course, assure you now that your donation amount had been received by the Association after a lapse of 4 years and we assure you that it will be used as per your desire to encourage people from Nagpur Zone by giving prizes in the name of "N.G.More Service Award".

Sorry for encroaching on your valuable time and with best regards.

Yours faithfully,
Sd/-
V. M. Gokhale
President

## अभिनंदनीय

आपले अमरावती येथील एक सभासद श्री.श्यामसुंदर किस्नगोपाल दम्माणी यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली याबद्दल त्यांचे असोसिएशनतर्फे मन:पूर्वक अभिनंदन ! ते बँकेत कार्यरत असतांना त्यांच्या आध्यात्मिक, साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील विशेष कामगिरी बद्दल त्यांना गुणवंत कामगार म्हणून गौरवण्यात आले होते. त्यांच्या या अनुकरणीय वाटचालीस शुभेच्छा.

**- सेक्रेटरी**

## प्रतिक्रिया

'संवाद' नोव्हेंबर २०१० च्या पाप्युलर मासिक पत्रिकेत प्रसिद्ध पावलेली, हास्यरंग पेरलेली 'प ची पचडी' (लेखिका सौ. शैला टेंभुर्णीकर, अहमदनगर) पचवून पाहिली. परमसंतोष प्राप्त जाहला.

**- सौ. माधुरी धुपकर,**
पुणे

# A HOME AWAY FROM HOME

An old colleague of mine had to shift to an Old Age Home (OAH) after his wife's death. I was sad for a moment as I thought that he is being ill treated in his own house. I was pleasantly surprised when he wrote to me how happy he was in his new house. My idea of an OAH till then was that it is a place where only orphaned aged people are dumped by their ungrateful children. My friend's letter changed my perception and I have a fresh look towards institution called 'OAH'.

Our needs in old age are few, like simple food, a small but exclusive space, clean and decent clothes etc. We also need love, affection, little bit of sharing and caring and someone to talk to get over loneliness. Management of most of the OAHs, barring a few, takes care of these needs in addition to entertainment, medical aid, religious discourses and physical fitness etc. to keep them occupied. So in that context OAH is like joint family.

The need for OAH is felt more in big cities as people have no time for family. In such a situation can a person afford to have old buddy in the house howsoever dear he or she may be? The seniors feel neglected despite all the comforts of life as they have nobody to talk to or listen to them. There are people who do have time but cannot afford to spare a separate room or money for the elders. They need proper medication, and different diet. Those who cannot provide these essentials really have a sort of guilt in their mind for obvious reasons. Then there are people who are abandoned by their own children and people who have to live alone as their children are settled abroad. Problems of issueless couples and bachelors and spinsters are beyond our comprehensions. All these people have something in common and that is their loneliness. All of them look for a place to shed this feeling. OAH could be a solace for them.

Can they not live with dignity, honor & respect? Who is the anchor for them? It is the society's duty to care for them. Home is where there is love and affection, where there is caring and sharing. So in that respect OAH is a good substitute for home.

Demand for OAHs will be growing as population of seniors is increasing. Efforts of good Samaritans are laudable but individuals' efforts are like drop in the ocean considering the magnitude of this problem. Their efforts need to be collectively supported by creating more OAHs.

OAH is a boon to senior citizens and to their relatives alike, as it is the need of the hour. It is very important for a person to understand the concept to mentally accept it as his new home. The person then won't feel that he is being deserted. He can live in dignity, respect and comfort that he truly deserves.

- ***Yashwant V.Deshmukh***, Mumbai - 400069 (M) 9322061054

## स्वत्व

प्रत्येकाचा स्वभाव कधी, अंतापर्यंत बदलत नाही
बदलू म्हटलं तरीदेखील, वळण कधी बदलत नाही
चांगलं वाईट कोण ठरवतं? परंपरेचे निकष लागतात
परिस्थितीच्या चक्रामध्ये, स्वभावघट घडत असतात
प्रसंगांच्या भट्टीमध्ये, घडला घट भाजला जातो
पक्का आकार तेव्हाच जातो, जेव्हा त्याचा अंत होतो
म्हणूनच प्रत्येकाचे, रंगरूप वेगवेगळे
त्यामुळेच टिकून असते, स्वत्व निरनिराळे

- **सौ.उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**, विरार, ठाणे

## आहेत खरे फास्ट ☺

"माझे बाबा इतके फास्ट आहेत ना की ते जेव्हा शिकारीला जातात आणि सावजावर बाण सोडतात तेव्हा बाण पोहोचण्या-आधीच ते सावजापाशी जाऊन थडकतात" बाळू सांगत होता.

"हॅ ! हे काहीच नाही... माझे बाबा पाचशे मिटरवरून हरणावर गोळी मारतात अन् हरिण खाली पडण्यापूर्वीच त्याला उचलून आणतात" काळू फुशारकीने म्हणाला.

"माझे बाबा तुमच्या बाबांसारखे हिंसक नाहीत पण ते खूप खूप फास्ट आहेत. कारण बाबांच ऑफीस सहा वाजता सुटतं पण बाबा ४ वाजताच घरी आलेले असतात" बंडूने सांगितलं.- ***मधु रानडे**, नाशिक*

## HOME IS WHERE HEART IS

Home is where family is, where sharing and caring for each other is the way of life. Love is the bonding link and trust is the vital and cementing factor that unites all the members in all testing times. It is truly heaven on earth.

It sends shiver down my spine when I hear of cases of where parents are deserted on the streets by their children after depriving them of all their hard earned money and their property.

I can't imagine the state of the mind of persons who have to leave their homes to settle elsewhere- it may be abroad, or their children's house or perhaps an OAH. It must have taken decades for them to build their house and then transform it into a sweet home- where their eyes have witnessed so many events of their growing family. How painful and difficult it would be for them to cut off all their attachments to their age-old mansion-full of sweet memories.

Given a few cases, why should anyone opt to stay in OAH- just to meet the demands of time or to make room for their children and grand children or for any other reason however serious it may be?

After having spent a lifetime in building our house of dreams, painting it with the colours of love seeing it grow as we wanted it, why should we be forced to abandon it at a stage when we are about to enjoy the fruits of our labour.

No doubt when age catches up all the organs of the body start dysfunctioning and we become dependant on servants to take care of the house and us. So our children feel we will be taken care of better in a OAH than in the house as they have no time to cater to our needs.

Despite all the comforts and company an OAH has to offer I just cannot imagine myself living under another roof. Well-paid servants, regular visits by the family doctor for check-up and keeping yourself occupied with friends groups or yoga or taking up a hobby can help us overcome the health problems & loneliness But if it comes to space problem it would be advisable for them to move out and build their own home instead of shunting us out of our own house.

There is no substitute to the concept of 'My Home'- where there is freedom & a belongingness which cannot be found in any OAH .No matter where you turn in your house - every nook and corner has some memory tucked away, where the prayers corner vibrates with our chorus singing, where each piece of furniture tumbles out with a series of anecdotes, where we laughed at so many silly jokes, where we cried and embraced each other when we separated- how can anyone on this earth even for a moment think of leaving this paradise-home, at least I will definitely not. Even an OAH with 5-star amenities would be a bane -a bed of thorns for me.

- ***Mrs. Manjeeta Y.Deshmukh***, Mumbai - 400069
(M) 9819602982

### विनोद ☺

एका नामांकित महाविद्यालयात एमबीए प्रवेश फॉर्म भरण्यात रामभाऊ मुलाला घेऊन गेले. फॉर्म भरताना त्यांनी वॉचमनला 'कॉलेज कसे आहे?' विचारणा केली.

चौकीदार म्हणाला, 'रामभाऊ कॉलेज छान आहे. मी इथूनच एमबीए केले आहे.'

**- पु. नि. देशपांडे,**
अमरावती

### विनोद ☺

रामभाऊ जेवण्यास बसले. पहिले घासातच भातात खडा लागला. तोंड दाबत पत्नीला म्हणाले, 'अग देवाने तुला चांगले २ डोळे दिलेत. साधे तांदूळ निवडता येत नाहीत?'

पत्नी शांतपणे म्हणाली, 'देवाने तुम्हाला ३२ दात दिलेत. साधा एक खडा चावता येत नाही?'

**- पु. नि. देशपांडे,**
अमरावती

## अनुकरणीय उपक्रम

दै. 'लोकसत्ता' वाचत असतांना, 'इथे अभ्यासाला जागा आहे' या शिर्षकाखालील एका छोट्या लेखाकडे लक्ष गेले. वैशिष्ठ्यपूर्ण शिर्षकामुळे उत्सुकता ताणली गेली व लगेच तो लेख वाचून काढला आणि सुखद आश्चर्याचा धक्का बसला. अहो, आपलेच एक सभासद श्री.सुभाष एरंडे यांनी चालू केलेल्या एका आगळ्या-वेगळ्या उपक्रमाबद्दल माहिती कळाली. आपल्या रहात्या वास्तूत गरजू विद्यार्थ्यांसाठी एक अभ्यासिका ते गेली अनेक वर्षे अत्यंत अल्प दरामध्ये चालवत आहेत. अपंग, गरीब आणि गरजूंसाठी ही अभ्यासिका नि:शुल्क आहे. शिवाय अभ्यासिकेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्याचा उपक्रमही ते दरवर्षी आवर्जून राबवतात. या समाजोपयोगी उपक्रमांत त्यांच्या पत्नि सौ.स्मिता याही आपली नोकरी सांभाळून पूर्ण साथ देत असतात.

५०-६० वर्षापूर्वी एरंडे कुटुंबीय पुणे येथील रविवार पेठेत १५ बाय १० फूट आकाराच्या एका खोलीत आई-वडील आणि तीन भाऊ असे पांचजण रहात असत. घरात अभ्यासाला शांत जागा नसल्याने ते आणि त्यांचा भाऊ रविंद्र हे शनिवारवाड्यात अभ्यासाला जात असत. अशा प्रतिकूल परीस्थितीत सुभाष एरंडे यांनी तीन पदव्या मिळवून आपल्या बँकेत उत्तमप्रकारे नोकरी केली व डिसेंबर २००५ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली. आर्थिक स्थैर्य आल्यामुळे १५ वर्षापूर्वी कोथरूडमध्ये स्वत:ची एक भव्य वास्तूही एरंडे कुटुंबीयांनी उभी केली. सर्व कुटुंब श्री दत्तभक्त असल्याने त्यात एक छोटेखानी श्री दत्त मंदिरही त्यांनी बांधले आहे. त्याच बरोबर, आपल्या लहानपणी जागेअभावी अभ्यासासाठी आलेल्या अडचणींची जाण ठेवून गरजू विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल अशी सर्वसोयींनी युक्त अशी प्रशस्त वेगळी जागा रहात्या वास्तूच बांधून घेतली आहे. एकावेळी पावणेदोनशे विद्यार्थी याचा लाभ घेऊ शकतात. गेल्या सहा-सात वर्षात या अभ्यासिकेच्या जवळ-जवळ साडेपाच हजार विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे. खरोखर, समाजाप्रति आपले उत्तरदायित्व काय आहे याची जाण ठेवून त्याप्रमाणे आचरण करणारे श्री. एरंडे यांचेसारखे कितीजण असतात? आपल्या निवृत्त सभासदांपैकी आपला वेळ अशा प्रकारें सत्कारणी लावणारे विरळाच ! श्री.सुभाष एरंडे व त्यांचे कुटुंबीय यांचे या समाजहितैषी उपक्रमाबद्दल अंत:करणपूर्वक अभिनंदन व कौतुक !!

– सेक्रेटरी

(श्री. एरंडे, मोबाईल – ९४२३५७४३५८)

### चेक

मला मान्य आहे, मी जन्मताना चेक दिलास तू
मला जगण्याचा, पण, ना कृपेची तारीख त्यावर
ना सुखाचा एक ही आकडा,
अरे, नाव सुद्धा नव्हतं माझं चेकवर
ते ही आई वडिलांनी टाकलं त्यावर
मी समजू शकतो माणूस म्हणून!
तू देव असलास तरी, घाई गर्दीत होत असं कधी कधी
पण घाई कुणाची? तुझी की माझ्या वासनांची?
आणि चेकवर सही नको तुझी? तुझ्या नामाची!
श्री विठ्ठल, श्रीराम, श्रीकृष्ण, नारायण...
एक तर सतरा नावं घेवून बसला आहेस, भक्तांच्या पेढीवर
कोणतं खरं मानायचं? चेकवर कोणतं नाव टाकायचं?
अरे, कसा आणि कुठे वठवायचा मी तो चेक आणि
किती जन्मांचे असे कोरे चेक, मी जमा करू
आता तू म्हणतोस, जामीन हवाय तुला संताचा
तर सही करतो
पण ज्ञानेश्वर नाही म्हणाले, समाधीस्त होते म्हणून
तुकोबांनी कानावर हात ठेवले
कर्जाचा टिळा लावून
रामदासांचा रोख ठोक व्यवहार
जामीनाला नकार
हल्लीच्या काळात
तुझ्या कलीयुगात
कुणी कुणाला जामीन राहतो का रे?
तू म्हणतोस ते खरं आहे
एक वेळ देव कळेल
पण माणूस मिळणं कठीण
आता मी चेक बंद करून, ठेवलाय पाकिटात
वर पत्ता लिहून 'श्री विठ्ठल नाम पत पेढी संस्था'
भक्तीमार्गे वैकुंठ धाम
तुला सही कराविशी वाटली तर कर, कृपेची तारीख टाकून
नाहीतर मी नंतर घेईन पाहून
सध्या मी घाईत आहे, पुढच्या जन्माच्या
कुणा अनुसयेच्या पोटी येण्याच्या

**- पद्माकर कुलकर्णी**, नवी मुंबई
☎ : २७७०९२८३

डॉ. सुचेता खानोलकर लिखित

## "तू आम्हा सोयरा"

(डॉ. सुहास सदानंद पेठे जीवनपरिचय)

आपल्या स्टेट बँकेतील निवृत्त अधिकारी श्री.सुहास सदानंद पेठे या थोर साधकांच्या साधना, विचार प्रवास आणि प्रत्यक्ष कार्याचे संक्षिप्त दर्शन घडविणारे हे पुस्तक लिहून डॉ.सुचेता खानोलकर यांनी फार मोठे कार्य केले आहे ! "हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हेच खरे संतांचे काम होय." या श्रीब्रह्मचैतन्यांच्या उक्तीनुसार उच्चविद्याविभूषित, वयाच्या केवळ २५ व्या वर्षी तत्त्वज्ञानाची पीएच्.डी. मिळवूनही भारतीय स्टेट बँकेत कार्यरत असलेले, प्रकृतीची पुरेशी साथ नसूनही बँकेतील काम निरलसपणे व चोखपणे करणारे, फावल्या वेळात साधनामग्न राहणारे आणि सहकाऱ्यांना साधनोन्मुख करणारे आणि आपल्या ज्ञानाचा मुक्त लाभ घेऊ देणारे असे हे पेठे महोदय. अगदी ठरवून स्टेट बँकेत २४ वर्षे नोकरी झाल्यावर कसल्याही आर्थिक लाभाची अपेक्षा न बाळगता, केवळ देवाच्या सख्यत्वासाठी नोकरीचा त्याग करणारे आणि कायिक, वाचिक, मानसिक तपाचरण करणारे श्री.पेठेकाका हे माझ्या पहाण्यातले खरोखरच अलौकिक व्यक्तिमत्त्व आहे. तसे पाहिले तर समस्त पेठे कुटुंबाशी माझा ४० वर्षाचा परिचय आहे. त्यांची आजी, वडील, आई, ज्येष्ठ बंधू, भगिनी असे संपूर्ण सात्विक कुटुंब. आपला मुलगा देवाच्या शोधासाठी वयाच्या १५ व्या वर्षी हिमालयाकडे जातो याचा अभिमान बाळगणारा पिता, वयाच्या १२ व्या वर्षीच मिरजेच्या 'शंकर तत्त्वज्ञान मंदिरा'तील १000 पुस्तके वाचून काढणारा तेव्हाचा सुहास, पतीच्या व्यवसायतिष्ठेमुळे होणारी आर्थिक परवड हसतमुखाने सोसणारी पेठ्यांची आई आणि प्रकृती रोगजर्जर असूनही आपल्या कामातील चोखपणामुळे आदर्श असणारे स्टेट बँकेत काम करणारे ज्येष्ठ बंधु इ. चा परिचय मात्र मला या पुस्तकामुळेच झाला. अखंड श्रीरामसेवारत असणारी सुहास पेठ्यांची आजी हा पेठ्यांच्या भक्तिमार्गावरचा पहिला आदर्श. श्रीब्रह्मचैतन्य महाराज हा तर पेठ्यांचा जीवनाधार. पेठेकाकांच्या साधनेचा आलेख डॉक्टर लेखिकेने सश्रद्धपणे मांडला आहे. प्रश्नोत्तरात जिज्ञासा आहे आणि नम्रताही आहे; आणि ती उभयपक्षी आहे. डॉ.खानोलकर पतिपत्नी पेठेकाकांच्या प्रकृतीची काळजी घेतात. तर या दांपत्याच्या आध्यात्मिक प्रगतीची जबाबदारी, भार पेठे काकांनी आपल्या शिरावर घेतला आहे. केवळ खानोलकर कुटुंबच नव्हे तर अशा अनेकांना मार्गदर्शन स्वत: 'क्रिया करून दावी अंगी' या तुकोक्तीप्रमाणे श्रीपेठेकाका कसे करतात हे पुस्तकावरून समजते. 'देवाच्या सख्यत्वासाठी जिवलगांशी तुटी' न घेताही त्यांचे सहकार्य कसे लाभते ते या सोयऱ्याने दाखवून दिले आहे. आज अगदी २१ व्या शतकाच्या प्रथम दशकातसुद्धा.

आपल्या स्वेच्छानिवृत्तीप्रसंगी श्री.पेठे काकांनी बँकेला एक निवेदन दिले. त्यात आपल्या जीवनात आपण काय साधले, मिळवले त्याचा आढावा घेतला आहे आणि आपणास काय साधायचे आहे त्याचे सुंदर इंग्रजी भाषेतील निवेदन अवश्य वाचावे असे आहे. श्री.पेठे यांनी स्टेट बँकेतल्या अनेक सहकाऱ्यांना पदोन्नती परीक्षांसाठी विनामूल्य मार्गदर्शन केले होते. **आनंदाची आणि उल्लेखनीय घटना अशी की शृंगेरीच्या शारदापीठाच्या श्रीमच्छंकराचार्यांकडून डॉ.सुहास सदानंद पेठे यांचा 'श्रीराम सद्गुण गौरव' श्रीरामनवमीच्या दिवशी विशेष सन्मानपत्र देऊन करण्यात आला आहे.**

साधकांना हे पुस्तक विनामूल्य घेतल्यासारखे वाटू नये म्हणूनच या ३३६ पानी पुस्तकाचे मूल्य नाममात्र रू. २०/- ठेवले आहे.

**- श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे**, पुणे
भ्रमणध्वनी - ९८२३२८५३९०

### *मैत्री काय चीज असते*

मैत्री करण्यासाठी नसावे लागते श्रीमंत आणि सुंदर
त्याच्यासाठी असावा लागतो फक्त मैत्रीचा आदर
काहीजण मैत्री कशी करतात?
उबेसाठी शेकोटी पेटवतात अन्
जणू शेकोटीची कसोटी पाहतात
स्वार्थासाठी मैत्री करतात अन्
कामाच्या वेळेस फक्त आपले म्हणतात
शेकोटीत अन् मैत्रीत फरक काय?
दोन्हीपण एकच जाणवतात
मैत्री करणारे खूप भेटतील
परंतु निभावणारे कमी असतील
मग सांगा खरे मित्र कसे असतील?
कधी भांडणाची साथ, कधी मैत्रीचा हात
कधी प्रेमाची बात अशी असते
नि:स्वार्थ मैत्रीची जात
या मैत्रीचा खरा अर्थ केव्हा कळतो
नेत्रकडा ओलावल्या अन् शब्द ओठावरच अडखळला
मित्र या शब्दाचा अर्थ तो दूर गेल्यावर कळला
आपल्यावर जीवापाड प्रेम करणारी
सुखदु:खाच्या क्षणी आपल्या मनाला जपणारी
जीवनाचा खरा अर्थ समजावणारी
काय चीज असते नाही ही मैत्री

**-शरयू अरविंद कुलकर्णी,** कोल्हापूर, मो. ९८८१३०२००५

## विलक्षण

मी आज एक गुपित तुम्हाला सांगणार आहे, की जे अजूनपर्यंत मी कोणालाच सांगितले नाही! परमेश्वराने दिलेल्या ह्या माझ्या दोन्ही पायांवर, मी अगदी एकांतात निवांत बसलो असताना एकटाच मनापासून प्रेम करीत असतो!! मी त्यांच्याशी संवाद साधतो. त्यांना गोंजारतो, कुरवाळतो, मायेने-प्रेमाने हात फिरवतो आणि आजपर्यंतच्या अमोल सहकार्याबद्दल त्या पायांचे प्रती कृतज्ञताभाव व्यक्त करतो. कारण निव्वळ एकच, त्यांच्यामुळेच आयुष्यात मी देश-विदेशांच्या भटकंतीचा माझा छंद मी पुरा करू शकलो. मग बघा,अस्मादिकांचे चरणसुद्धा जरा लाडात येतात आणि सांगतात, ''तो मणिकरणचा घडलेला किस्सा आठवतो का? आपल्या वाचकांना जरा ऐकव ना.'' माझं मन मला हळूच टपली मारून सांगतं, ''अरे यार, तो विलक्षण अनुभव, तू शेअर करायलाच हवा!!''.....

मंडळी, मला जर कोणी विचारले, की तू अजूनपर्यंत पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळांपैकी हृदयाच्या कोपऱ्यात, अगदी आठवणीने जपून ठेवावं, असं कुठलं ठिकाण असेल, तर पटकन मी 'मणिकरणं' असे उत्तर देईन! त्या हिमाचल प्रदेशाच्या पर्यटनानं, ती हिमशिखरे, निसर्ग सौंदर्याने नटलेले रस्ते, नागमोडी वळणे घेत वाहणाऱ्या बियास व सतलज नद्या, सूचीपर्णी, पाईन व देवदार वृक्षांची डोळ्यात भरणारी नजाकत आणि तिथली बोचरी थंड हवा, या सर्व अमूर्त वाटणाऱ्या कल्पना मी ह्याचि देही, ह्याचि डोळा मनमुराद अनुभवल्या आहेत. कुलूमार्गे ५० किलोमीटर व जवळ जवळ १८०० मीटर उंचीवर असलेल्या मणिकरणला पोहचण्यास त्या दिवशीची दुपार टळून गेली होती. तिथल्या खळखळत्या पार्वती नदीच्या दुतर्फ्यावर वसलेले मणिकरण हे छोटसं ठिकाण. माझे मणिकरणला दोनच दिवसाचे वास्तव्य असल्यामुळे मी पायथ्याशी असलेल्या महागडी-पॉश हॉटेले यांचा विचार न करता, सरळ माथ्यावरती एका लहान खोलीमध्ये जागा मिळवली. दुसऱ्या दिवशी परतीचा प्रवास असल्यामुळे मिळालेला वेळ फुकट न दवडता सरळ भटकण्यासाठी जो बाहेर पडलो तो वाट फुटेल तिकडे, जणू पायाला भिंगरी लागल्यागत नुसता भटकत होतो. कुठेही फिरले तरी निसर्गाने ओतप्रोत भरलेला हिरवा नजारा दिसत होता. श्रीगुरू नानक यांचे गुरुद्वारा, शिव-पार्वती मंदिर डोळे भरून पाहिले. तिन्ही सांजेची वेळ झाली होती. मणिकरण पिंजून काढल्यामुळे दमछाक झाली होती. चांगला मस्त चहा पिण्याचे ठरवून पायथ्याशी एका चांगल्या हॉटेलमध्ये शिरलो. हॉटेल एका सरदारजींचे होते. हॉटेल ऐसपैस असून वर्दळ अशी नव्हती. हॉटेल मालक सरदारजीने एक टूरिस्ट या नात्याने मला सलाम करून ''आईये'' म्हणून माझे स्वागत केले. प्रचंड थकल्याने खुर्चीवर अक्षरश: मी माझा जीव विसावला आणि चहाची ऑर्डर दिली... सरदारजी उंचापुरा, धिप्पाड व उमदा होता. आकाशी रंगाचा शर्ट, निळी पॅन्ट, लाल पगडी व भरदार तुकतुकीत दाढी-मिशीमुळे तो रांगडा सरदारजी डोळ्यात भरत होता. चहा पीत असताना सरदारजी माझ्यापाशी आला, ''हॅलो, आप बंबईके है या पूनाके?'' सरदारजीचा पहिला सवाल. मी म्हटलं, मुंबईचा, राहतो अंधेरीला आणि स्टेट बॅकेमध्ये मुख्य शाखेत कामाला आहे. त्याच्या अधोरेखित प्रश्नांची मी आधीच उत्तरे देऊन मोकळा झालो होतो. स्टेट बँक म्हटल्यावर सरदारजीने कान टवकारले आणि विचारले, ''आप स्टेट बँकवाले? बलबिरसिंगको जानते हो क्या?'' मी म्हटले, ''अच्छी तरह, वो तो हमारे हॉकी टीमके एक खिलाडी है. वो हेड-ऑफिसमें काम करते है.'' हे ऐकल्यावर सरदारजी एकदम खूष झाला आणि माझ्या समोरच्या खुर्चीवर येऊन बसला. मला विश्रांतीची गरज होती व सरदारजीला टाईमपास हवा होता. नंतर बऱ्याच वेळ आमच्या गप्पा चालल्या होत्या. इतक्यात एक संन्याशी साधू बाहेरून आला. ओंगळ शरीर व भोंगळ पोषाख. 'जय जय शिवशंकर! भोलेनाथ की जय हो!!' बाहेरूनच ललकारी देत तो आत शिरला. सरदारजी उठून उभा राहिला. म्हणाला, ''क्या चाहिए आपको'' साधु म्हणाला, ''बेटे तीन दिनसे मैं भूखा हूँ. पार्वतीमाता का कर्ण-मणी जिस पवित्र कुंडमें गुम गया था और शंकरजीने उसे ढूंढके निकाला इस मणिकरणमे, इतने लंबेसे स्नान करने आया था. अब मुझे थोडी चक्करसी मेहसूस होने लगी है. ये गरीब साधुको कुछ खाना खिलाना. आपको पुण्य लग जायेगा. काकुळतीला येऊन साधूने सरदारजीकडे विनंती केली. त्याचे ते बोलणे ऐकून रागाने सरदारजीचे पित्त जे खवळले, तो एकदम साधूच्या अंगावरच धावून गेला आणि म्हणाला, ''अभ्भीके अभ्भी, इधरसे निकल जाना वरना मारकर आपको भगा डालूंगा साधूका भेस चढाकर, भीक मांगनेको शरम नहीं आती...?'' असे बोलून त्याने आपल्या तोंडाचा जो पट्टा चालवला की रागाने साधू ह्या प्राण्याविषयीची भडास आपल्या दहा मिनिटांच्या बोलण्यातून त्याने व्यक्त केली. मी मात्र भीत भीत निमूटपणे हे सर्व ऐकत होतो. तो साधू जाण्यास निघाला. जाताना एकच वाक्य बोलला, ''बेटा, घुस्सा काबूमें रख, भगवान आपका भला करें.'' असे म्हणून त्याने हात वरती करत सरदारजीला आशीर्वाद दिला. आशीर्वाद देताना त्या साधूच्या हाताकडे सरदारजीची नजर जाताक्षणी, तो एकाकी एवढा शांत झाला की त्याचा राग क्षणार्धात निवळला! पटकन पुढे येऊन त्याने चक्क त्या साधूचे पाय धरले आणि म्हणाला, ''मुझे माफ करना. संन्यासी महाराजजी आपको गंदी-गंदी बाते बोलके, मैने बहुत बडी गलती की, मुझे माफ करना'' असे म्हणून त्याने साधूला

तात्काळ साष्टांग नमस्कार घातला. हा एकदम ट्रान्सफर सीनचा काय प्रकार चालला आहे ते आश्चर्यचकित होऊन मी पाहण्याचे काम करीत होतो. तो साधू मात्र एकदम तटस्थ तिथेच उभा होता. लगेच सरदारजीने आपल्या वेटरला ऑर्डर देऊन पटापट साधूसाठी, गरमा गरम पराठे, स्पेशल राजमा, पुलाव आणि जिलेबी मागवून त्याला यथेच्छ भरपेट जेवू घालून संतुष्ट केले. त्यानंतर साधु नको नको म्हणत असताना,एक मोठा लस्सीचा ग्लास पुढ्यात आणून, घेण्यासाठी आग्रह केला. साधु खरोखरच तृप्त झाला. जाता जाता तो म्हणाला, ''बेटा तू अगोदर जे काय वागलास, ते सर्व विसरून, तुझ्या ह्या पाहुणचाराने मी कृतकृत्य झालो आहे, परंतु मी तुला आशीर्वादाशिवाय काहीच देऊ शकत नाही, ह्याचे मला अतिशय दु:ख होत आहे.'' असे म्हणून त्याने परत एकदा एकदम हात वरती करून ''भगवान आपका भला करे'' असा आशीर्वाद देत त्याने त्याच्या डोक्यावर हात ठेवले. त्याबरोबर आपल्या दोन्ही हाताने त्या साधूचे हात पकडून, सरदारजी म्हणाला, ''मला तुझ्याकडून खरोखरच काही नको, परंतु तुझा आशीर्वाद म्हणून, तुझी आठवण म्हणून, तुझ्या हातातले ते कडे आहे ते मला दे. कारण माझ्यात झालेल्या आकस्मिक बदल ते तुझे कडे आयुष्यभर पाहून मला नेहमी तुझी याद करून देईल.'' क्षणाचाही विचार न करता, त्या साधूने आपल्या हातातले कडे सरदारजीकडे सुपूर्द केले आणि त्या गर्द रात्रीच्या काळोखात हलक्या पावलाने तो निघून गेला. साधु गेल्यानंतर काही वेळाने, मी सुद्धा सरदारजीचा निरोप घेता घेता म्हणाले, ''तुझा हा शिष्टाचार बघून मी पुरता गोंधळून गेलो. हे मित्रा, तुझ्या स्वभावाचा काही ठावच लागला नाही.'' त्यावर सरदारजी म्हणाला, ''अरे नेहमी आयुष्यात मतलब साधण्यासाठी रॅशनल विचार करावा लागतो, मी त्या साधूला खाऊ-पिऊ घातले ते काय इमोशनल होऊन नाही. ज्यावेळी तो आशीर्वाद देताना क्षणार्धात त्याच्या हातावर असलेले ते मौल्यवान कडे माझ्या नजरेत भरले आणि तो 'एंटीकपीस' असलेले कडे पाहून माझ्या मनात बरेच व्यवहारिक विचार आले. मी त्याच्यावर खाण्यासाठी खर्च केल्यापेक्षा ते त्यांच्या हातावरचे नक्षीकाम केलेले पंचधातूचे कडे मला बरेच काही मिळवून देईल हा विचार करून मित्रा, मी त्याची खोटी भलावण करून हे सर्व नाटक केले!.....''

दुसऱ्या दिवशी सामानाची बांधाबांध करून सरदारजीचा औपचारिक निरोप घेण्यासाठी त्याच्या हॉटेलवर गेलो. जाताना हातात हात घेत एवढेच बोललो, ''काल मात्र तू कमालच केलीस.'' सरदारजी म्हणाला, ''अरे, मित्रा, खरी कमाल तर आत्ताच अर्ध्या तासापूर्वी झाली. काल मिळालेल्या कड्याचे मी रात्रीच आमच्या तंदुरीच्या भट्टीत मुशीमध्ये राखेत घासून ते कडे माझ्या हॉटेलच्या काउंटरवर डिस्प्ले करून ठेवले होते. थोड्या वेळापूर्वी एक जॅपनिज जोडपे इथे हॉटेलात आले, त्यांच्या दृष्टीस हे कडे पडले आणि ते दोघेही एकदम ओरडले, 'धिस इज दी रेअर एंटीक पीस' म्हणून त्याने दोनशे डॉलरचा सौदा करून ते कडे घेऊन गेले. ''सरदारजी आपल्या खिशातून शंभर डॉलरच्या दोन नोटा, आपल्या राकट हातामध्ये थुंय् थुंय् करून नाचवत भेसूर हसून मला सांगत होता....''

मणिकरण सोडताना माझ्या दृष्टीने एक खुला विचार मनांत आला. माणसाने माणसाला 'माणूस' ठरवण्यापूर्वी माणसात व प्राण्यात निश्चितच फरक होता. तो म्हणजे, माणसाला देवाने दिलेली विचार करण्याची मानसिक क्षमता. सरदारजीच्या त्या प्रगल्भ मानवी मेंदूतून क्षणार्धात असे व्यावहारिक अप्रगल्भ आलेले विचार आलेले पाहून, मला विचारपूर्वक असं म्हणावसं वाटतं की माणसांइतकं विलक्षण असं या जगात काही नाही. Nothing is Unique like a man.

- **माधव नाडकर्णी**, मुंबई

दूरध्वनी - २६७७७३३९

## प्रेमाचा संदेश

प्रेमाचा संदेश द्यावया अवतरली नारी
जगदोद्धारा धरली हाती पाळण्याची दोरी
प्रेमाचा संदेश द्यावया अवतरली नारी ।।धृ.।।
गवळण राधा हरिनामी गुंगली
संसार विसरूनी झाली ती बावरी
प्रेमात न्हाऊनी बनली कृष्णवेडी
मधुराभक्ती करूनी विख्यात झाली नारी ।।१।।
वेडी बालिका मीरा कृष्ण मानते पती
विवाह झाला राण्याशी परी नाही सोडली प्रीती
क्रोधित होऊनी राणाजी विष प्याला धाडती
अमृत समजुनी प्राशन करता गिरीधर तिजला तारी ।।२।।
भक्तीसागरामध्ये डुंबते संताची दासी
दास्यकर्म करता करता परमार्थी रंगली
गोड अभंग रचिते दासी जनी नामयाची
दळण कांडप करण्या मदतीला धावतो श्रीहरी ।।३।।
पंढरीच्या वारीची सखूला लागली हो आस
सासरच्या माणसानी तिला दिला बंदीवास
तिची जागा घेऊनी प्रभूने पंढरीला धाडली
पायाशी मुक्ती देऊनी संपवली जन्ममरणाची फेरी ।।४।।

- **गजानन अराणके**, पुणे

भ्रमणध्वनी - ९३२४५५८०५१

## *मी व माझी बँक*

''का हो, तुम्ही गुरू केला आहात का?''

नक्की मलाच उद्देशून प्रश्न उच्चारला आहे याची खात्री होताच मी अर्धवट झोपेतून जागा झालो. घाटाचा रस्ता सुरू झाल्याने घर्र घर्र असा मोठा आवाज करीत एसटी बस रस्त्याने धावत होती. माझ्या समोरचे दोन पॅसेंजर्स केव्हा उतरून गेले हेसुद्धा मला कळले नव्हते. माझ्या शेजारी बसलेले गृहस्थ मलाच वरील प्रश्न विचारीत होते याची खात्री झाल्यावर मी पूर्णपणे जागा झालो आणि एकवार समोरच्या गृहस्थांकडे नजर टाकली.

पांढरा शुभ्र शर्ट, तसाच पायजमा, गौर वर्ण, डोक्यावर गांधी टोपी, कपाळावर अष्टगंधाचा उभा टिळा, सुरमा घातल्यासारखे काळेभोर डोळे, धारदार नाक, दाढीचे खुंट किंचित वाढलेले असले तरी तरतरीत चेहरा, वय पस्तिशीच्या आसपास.

बराच वेळेपासून चाललेली त्यांची अध्यात्मावरची बडबड ऐकूनच मी डोळे मिटून घेऊन जसे काही आपले लक्षच नाही असे दाखवीत झोपल्याचे नाटक करीत होतो. पण आता त्याचे आधीचे श्रोते उतरून गेल्यामुळे त्याने माझ्याकडे मोहरा वळविला होता. म्हणूनच मला प्रश्न विचारल्यामुळे जागे होऊन प्रश्नास उत्तर देणे मला भाग होते.

ज्यांचे घराणेच ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचे घराण्याशी जोडले गेले आहे, त्याच घराण्यातील व्यक्तीला गुरुमहिमा शिकवणे म्हणजे एक विनोदच नव्हे काय! समोरच्या व्यक्तींची गंमत करावी म्हणून मी म्हंटले, 'नाही'.

थोडावेळ थांबून त्या व्यक्तीने पुन्हा पूर्वीचेच विवेचन म्हणजे कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग आणि गुरुमहिमा सांगण्यास सुरूवात केली. सतत १० मिनिटे ती व्यक्ती बोलत होती व मी ऐकत होतो.

आमचा प्रवास ८० टक्के संपला होता. आता शेवटपर्यंत आपण बोअर होणार याची खात्री झाल्याने आता आपणासच काहीतरी बोलले पाहिजे असा विचार करून त्यांना मध्येच अडवून मी बोलण्यास सुरूवात केली. ''हे पहा साहेब, मी स्टेट बँकेत नोकरी करतो, तुमचा कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग व गुरुमहिमा यावरील सर्व आख्यान मी पूर्णपणे ऐकले आहे. पण त्यातील मला काहीच समजले नाही. मला एवढेच माहीत आहे की, बँकेची ड्यूटी करीत राहाणे हा माझा कर्मयोग, बँकेबद्दल ज्ञान मिळविणे हाच माझा ज्ञानयोग व माझे कर्तव्य प्रामाणिकपणे व सचोटीने काम करीत राहाणे हाच माझा भक्तियोग.''

याचा अर्थ तुम्ही स्वार्थी आहात. बँक तुम्हास पगार देते. म्हणूनच तुम्ही असे समजता. थोडाबहुत तरी परमार्थाचा विचार करा ना.'' समोरची व्यक्ती त्वेषाने बोलत होती.

मी शांतपणे म्हणालो, ''तुम्हीच मघाशी म्हणाला होतात की, कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।''

''त्याचा इथे काय संबंध ?'' कपाळावर आठ्या पाडीत ते गृहस्थ उद्गारले.

मग मीच खुलासा केला. ''मग पहा साहेब, महिनाभर मी प्रामाणिकपणे, काया, वाचा, मने बँकेची सेवा करतो म्हणूनच महिना संपल्यानंतर न मागता आपोआपच जर बँक पगाररूपी फळ माझ्या पदरात टाकत असेल तर मग ते माझ्याच कष्टाचे, माझ्याच सेवेचे, फळ मी स्वीकारू नये काय? यात माझा स्वार्थीपणाचा संबंध येतोच कोठे?''

''तुम्ही काहीही म्हणा, पण तुमचा हा खुलासा मात्र मला पटत नाही.'' काय उत्तर द्यावे हे न सुचल्याने ती व्यक्ती पुटपुटली.

नंतर मीच म्हटले, ''जाऊ द्या ते, मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो. फक्त विचार करून उत्तर द्या.''

''हा, खुशाल विचारा की'' त्या व्यक्तीने उत्तर देण्याची मानसिक तयारी दर्शविली.

''प्रश्न साधाच आहे. पण विचार करून उत्तर द्या.'' मी परत एकदा त्यांचेकडे नजर टाकली.

''हो म्हणालो ना एकदा'' वैतागून ते म्हणाले.

''ऐका तर, तुम्ही कधी 'स्टेट बँक' पाहिली आहे का?''

''म्हणजे? काय, नेहमीच पाहतो.'' आश्चर्यचकित होऊन माझी कीव करीत त्या ग्रहस्थांनी उत्तर दिले.

''याचाच अर्थ तुम्हाला माझा प्रश्नच कळला नाही. पुन्हा नीट विचार करून उत्तर द्या.''

''म्हणजे'' प्रश्नार्थक चेहऱ्याने माझ्याकडे रोखून पाहात ते गृहस्थ उद्गारले.

मी समजूतीच्या स्वरात त्यांना म्हणालो, ''हे पहा, तुम्ही बँकेचा बोर्ड पाहिलात, इमारत पाहिलीत किंवा आणखी पुढे जाऊन तुम्ही बँकेतील फर्निचर्स, काऊंटर्स, रजिस्टर्स, लेजर्स व स्टाफ पाहिलात. यापैकी कोणती स्टेट बँक आहे सांगू शकाल?''

आता मात्र ते गृहस्थ बुचकळ्यात पडले व विचार करू लागले. मग मीच त्यांना परत छेडले व म्हणालो, ''बँकेच्या बोर्डास किंवा इमारतीस तुम्ही स्टेट बँक समजता काय?'' मी आणखी एक गुगली टाकून पाहिली.

''नाही, मग असं असेल तर, तुम्हीच सांगा ना! स्टेट बँक कोठे आहे ते. ती तुम्ही तरी पाहिली आहे काय?''

त्या गृहस्थानी मलाच प्रतिप्रश्न केला. मग मात्र मी पुढे सरसावलो आणि म्हणालो, ''मला तर उत्तर माहीत आहेच,

म्हणून तर मी प्रश्न विचारला. याचेही पुढे जाऊन सांगतो. तुम्हाला जी स्टेट बँक कळली नाही, समजली नाही त्या स्टेट बँकेची मी सेवा करतो. आता मीच तुम्हाला एक विनंती करतो. आतापर्यंत तुम्ही तुमच्या ज्या गुरुंचे गुणगान करीत होतात त्यांनाच हा प्रश्न का विचारीत नाही.''

आता मात्र ते गृहस्थ मनातून खूपच ओशाळले व प्रगटपणे म्हणाले, ''साहेब, गेले दोन तास मी तुम्हाला अध्यात्मावर लेक्चर देत होतो. पण तुम्ही दहाच मिनिटात माझ्या सर्व व्याख्यानावर पाणी फिरवलेत. तुम्ही फारच पुढे पोहोचलेले आहात. तुमचा प्रश्न मी अवश्य माझ्या गुरूंना विचारेन. पण तत्पूर्वी माझी एक विनंती आहे. मी तुम्ही पूर्ण करावी.''

मी पण उत्सुकतेने विचारले, ''कसली विनंती?''

ते गृहस्थ विनवणीच्या स्वरात म्हणाले, ''एक वेळ तुम्ही माझ्या गुरूंना भेटावयास चलावे'' मी विस्मयचकित झालो. आमचा प्रवास संपत आला होता. फक्त पाच-दहा मिनिटांचाच उरला होता. उत्तर काय द्यावे म्हणून क्षणभर विचारात पडलो व शेवटी घाईघाईत बॅग हातात घेत म्हणालो, ''साहेब, आज माझी व तुमची भेट होणार हे आपणा दोघांना तरी कोठे माहीत होते? अशा भेटी थोड्याच आपल्या हातात असतात? त्या ठरविणारा वेगळाच आहे.''

तरी पण त्यांनी हट्ट सोडला नाही. म्हणाले, ''मी स्वत: सर्व काही व्यवस्था करेन. फक्त तुम्ही मला तसं वचन द्या.''

मी त्यांना म्हणालो, ''हे पहा. आपणा दोघांची भेट निश्चित नसतानाही त्या विधात्याने आपणा दोघांना दोन तासांसाठीच का होईना, एकत्र आणले होते. तसेच तो जे काय ठरवेल त्यास माझी सम्मती धरूनच चालावी.''

''आभारी आहे.''

''आता आपणा दोघांच्या भेटीची पण वेळ संपत आलीय. आपण गाडीतून उतरल्यानंतर आपापल्या मार्गाने निघून जाणार आहोत. नंतर आपण भेटूच याचाच जिथे भरवसा नाही तेथे माझी व तुमच्या गुरूंची भेट कशी होणार. यानंतर आपण दोघेच निवांत भेटण्याचा प्रयत्न करू या. त्यावेळी पाहू.''

''ठीक आहे, जशी तुमची इच्छा.'' नाराजीतच त्या ग्रहस्थानी निरोप घेतला.

मी पण मनातल्या मनात गदिमांच्या त्या दोन ओळी गुणगुणतच घरी परतलो.

''दोन ओंडक्याची होते, सागरात भेट।
एक लाट तोडी दोघा, पुन्हा नाही गाठ॥

- **शं. मु. हुद्देदार,** अहमदनगर
मो. नं. ९९७०५३९७६५

## राधा

तगमग करी जीवाची, ती भेट त्या दिसाची
पहिलाच स्पर्श सांगे, ओळख युगा-युगांची! ॥धृ.॥
दिसलास तू समोरी, अन् भरला मनी सुगंध
कोषी हृदयफुलाच्या, धुंदावला मिलिंद
मन आवरू कसे हे, ज्या ओढ चातकाची! ॥१॥
तू हासताच माझ्या, गाली फुले गुलाब
दृष्टीस वेड लावी, तव नयनातली शराब
नजर बावरी कां, वळते पुन्हा-पुन्हाची! ॥२॥
जाता जवळूनी तूं, हळुवार स्पर्श झाला
देहातल्या कळ्यांची, फुलली बकुळमाला
माझी न राहिले मी, जणु राधा गोकुळीची! ॥३॥
तू दृष्टिआड होता, आली मनास जाग
आणि फणा उभारे, ऊरामधील आग
होऊन तू मुरारी, कर वृष्टि अमृताची ॥४॥

- **गोविंद करमरकर,** सांगली
मो. - ८८०५९९५९८२४

## कल्पवृक्ष

एका शांत, निवांत वेळी, गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे 'कल्पवृक्ष कन्येसाठी लावूनिया बाबा गेला' हे गीत कानी पडले. गाणे ऐकत असतानाच बागेतल्या नारळीच्या झाडाकडे लक्ष गेलं. वाऱ्याच्या झुळुकेवर झाड डोलत होतं. षोडशवर्षीय तरूणीसारख्या कोवळया झावळया झुलत-डुलत होत्या. कोवळी श्रीफळं बाळसं धरत होती. वयात आलेली श्रीफळं आणि वयोवृद्ध झावळ्या, कल्पवृक्षाची साथ सोडून धरणीशी सलगी करीत होत्या. मन हरपून गेलं.

हे नारळीचं झाड माझ्या आजोबांनी लावलं की वडीलांनी माहिती नाही. तरीही हा वयोवृद्ध कल्पवृक्ष आजही प्रतिवर्षी मला १५०/२०० नारळ देत आहे. त्याला कल्पवृक्ष म्हणण्याचे कारण म्हणजे सुकी झावळं, सोलपटं, नारळाच्या करवंट्यांचे जळण, पानांच्या हिरकेरसुण्या, भाजीवर खोबरं, नारळाच्या दुधाची सोलकढी, मोदक, नारळीभात आणि अजून बरंच काही देतोच आहे.

पर्यावरण, वृक्षारोपण याचं महत्त्व आपणाला आता समजू लागलंय. तर मग वृक्षारोपणासाठी या श्रीफळाच्या कल्पवृक्षाला विसरून कसं चालेल?

- प्रभाकर कानिटकर, कोल्हापूर
भ्रमणध्वनी : ९८८११९९१९९

## 'खरा तो एकची धर्म....'

एक गजबजलेलं लग्नघर... घरातलं पहिलंवहिलं कार्य तोंडावर आलेलं... डॉक्टर मुलाला साजेशी त्याच पेशातली वधू मिळाल्याने, दुधात खडीसाखर विरघळावी तसा आनंदीआनंद... खरेदी केलेल्या वस्तूंचा गोड पसारा सर्व खोल्या व्यापून उरलेला... या गडबडीतही हॉलमध्ये समोरच बेडवर पडून राहिलेल्या एका कृश वृद्धेकडे प्रत्येकाचं लक्ष. हे दृष्य कुठल्या मालिकेतील किंवा सिनेमातील नव्हे, ते आहे ठाण्यातील तीन पेट्रोलपंपाजवळील 'विजय अपार्टमेंट्स' मध्ये रहाणाऱ्या 'भास्कर व लक्ष्मी ठाकूर' यांच्या घरातलं. मुख्य म्हणजे ती वृद्धा म्हणजे आई, सासू किंवा नात्यातील कोणी स्त्री नव्हे तर त्या आहेत मुलं व घर सांभाळण्यासाठी ठेवलेल्या 'मावशी.' काय बसला ना ४०० व्होल्टचा शॉक! 'खरा तो एकची धर्म....' ही सानेगुरुजींची शिकवण प्रत्यक्ष आचरणात आणणारं असं एखादं कुटुंब या कलियुगात अस्तित्वात आहे... यावर विश्वास नाही ना बसत? पण कधी कधी सत्य हे कल्पनेपेक्षा अद्भुत असतं म्हणतात ना, ते असं.....

या कहाणीची सुरुवात सुमारे ३० वर्षांपूर्वी झाली. प्लेगच्या साथीत नवरा व मुलं गमावल्यावर उध्वस्त झालेल्या मावशी (मूळ नाव शेवंताबाई देशमुख) त्यांच्या गावाहून म्हणजे मुरबाडहून इकडच्या तिकडच्या ठोकरा खात लक्ष्मीच्या दारात येऊन पोहचल्या. तो क्षण म्हणजे त्यांच्या आयुष्यातील 'टर्निंग पॉइंट'. दयाळू वृत्तीच्या लक्ष्मीने त्यांना आसरा दिला. आधीच्या कामावर असताना, बँकेतील खात्यात पैसे भरताना वेळोवेळी केलेली मदत हाच काय तो ओळखीचा धागा. (लक्ष्मी त्यावेळी स्टेट बँकेच्या नौपाडा (ठाणे) शाखेत काम करत होती.) ठाकूरांच्या घरात चार माणसं, पती-पत्नी, ३ वर्षाचा संतोष व त्याला सांभाळणारा एक १४/१५ वर्षाचा मुलगा. इनमिन ३ खोल्यांचं घर. (अलिकडे नशिबाने लगतची एक खोली मिळालीय.) तरीही लक्ष्मीने त्यांना समावून घेतलं. मात्र घरात पाऊल टाकल्यापासून मावशीचं त्या कुटुंबाशी, त्या वास्तूशी नातं जुळतं ते कायमचं.

हळूहळू घरातली बरीचशी जबाबदारी मावशींनी उचलली. कपाटाच्या चाव्याही त्यांच्या कमरेला लटकू लागल्या. त्यांच्या जीवावर लक्ष्मीने दुसरा चान्सही घेतला. जन्माला आल्यापासून अंगाखांद्यावर वाढवलेला 'श्री' हा तर त्यांचा जीव की प्राण. दोन्ही मुलांना काय हवं ते करून देणं... आजारपणात रात्र रात्र त्यांच्या उशाशी बसणं... अभ्यास करताना सांगतील ते लाड पुरवणं... यामध्ये भराभरा वर्ष उलटली. लक्ष्मीनेही स्वयंपाकघर त्यांच्या ताब्यात दिलं आणि मुलांच्या प्रगतीकडे आणि बँकेच्या कामात स्वत:ला झोकून दिलं.

बघता बघता संतोष डॉक्टर झाला. तो देखील असा तसा नव्हे तर 'एम डी' च्या परीक्षेत सुवर्णपदक मिळवून. मिस्टर आणि मिसेस ठाकूरही बँकेच्या सेवेतून निवृत्त झाले आणि जणू याच गोष्टीसाठी थांबून राहिलेलं मावशींचं सांध्यांचं दुखणं ऐरणीवर आलं. त्याआधीही दोन-तीनदा हॉस्पिटलची वारी झालीच होती. त्यावेळी सुरू असलेली संपूर्ण कुटुंबाची धावपळ, पैशाचा जराही विचार न करता लागेल ते औषध त्वरित आणून देण्याची तयारी, चहा-नाश्ता-जेवण यांचे डबे पोहचवण्यासाठी चालणाऱ्या लक्ष्मीच्या फेऱ्या.... हे सर्व पाहून ट्रीटमेंट देणारे डॉक्टर न राहवून म्हणाले की, नोकरमाणसांसाठी एवढं रक्त आटवणारी बाई मी प्रथमच पाहिली.

त्यानंतरही या सांध्यांच्या दुखण्याने मावशींचा पिच्छा सोडला नाही. गेली ५-६ वर्ष तर त्या जवळ जवळ अंथरूणावरच आहेत. अर्थात घरच्या डॉक्टरचं त्यांच्यावर पूर्ण लक्ष आहे. शिवाय धाकटा 'श्री' ही आता एम्.बी.बी.एस्. होऊन एम.डी. ची तयारी करतोय. या दोन्ही मुलांवर 'दृष्ट लागावी' असे संस्कार आहेत. गुडघ्यांना बाम/तेल चोळून देणं... गरज असेल तेव्हा उचलून कमोडवर नेऊन ठेवणं... रात्री झोपताना नॅपी बांधणं... अशी कामं अत्यंत आपलेपणाने केली जातात.

कालापरवाचीच गोष्ट. लक्ष्मीच्या मनात आलं. 'घरात कार्य म्हणजे आता पाहुणेरावळे येणार... त्यांचं सामानसुमान.. झालंच तर नवग्रहशांती, पूजा वगैरे विधींसाठी थोडीतरी मोकळी जागा हवी... तेव्हा चार-आठ दिवस मावशींना हॉस्पिटलमध्ये हलवलं तर... यावर डॉ. संतोषचा सवाल होता, 'लग्न झाल्यावर पाया पडायला, आशीर्वाद घ्यायला मावशी घरी नकोत का?' श्री तर त्यांचा पक्का समर्थक. मावशींचा युरीन कंट्रोल आता उरला नाही.. असं नुसतं म्हटलं तरी आपली जाडजूड पुस्तकं उघडून दाखवून देईल की, 'वय झालं की असं घडणं कसं स्वाभाविक आहे ते...'

मावशींनाही आपल्या या दोन हिऱ्यांचा कोण अभिमान. आल्यागेल्याला सहज सांगत असत, 'माझी मागच्या जन्मीची पुण्याई म्हणून मला हे असं घर भेटलं.' त्या अंथरूणावर पडून असल्या तरी त्यांचा पगार आजही चालूच आहे. लक्ष्मीचं म्हणणं, 'आपल्याला नाही का शेवटपर्यंत पेन्शन मिळत? घरातल्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी किंवा इतर कोणत्याही आनंदाच्या प्रसंगी आजीबाईंच्या या बटव्याचं तोंड मोकळं होतं.

सध्या तर तब्येत अतिशय क्षीण झाल्याने त्यांच्यासाठी स. ८ ते सं. ८ या वेळात एक मदतनीस ठेवली आहे. शिवाय त्यांचं जेवणखाण, औषधपाणी वेळच्यावेळी देण्यासाठी घरची लक्ष्मी तत्पर आहेच. अंथरुणावर पडल्या पडल्या, कधी त्यांना भजी किंवा तत्सम काही खाण्याची इच्छा होते, लगेच

तळणासाठी गॅसवर कढई चढते. लक्ष्मी मनात आठवत रहाते, 'आपल्याला नाही का हवं तेव्हा हवं ते करू घातलं त्यांनी?'

ठाकूरांचं संपूर्ण कुटुंबच देवभक्त आहे. लक्ष्मीची तर 'संतोषी माते'वर प्रचंड श्रद्धा. त्यासाठी तिने स्वखर्चाने अलिकडेच मखमली तलावाजवळील मारुतीच्या देवळात मातेच्या मूर्तीची स्थापना केली आहे. तिच्या आशीर्वादाने घराला मनासारखी सूनही मिळाली आहे. सूनमुख बघण्याची मावशींची शेवटची इच्छाही आता पूर्ण झाली आहे. (लग्न बघितलंच पाहिजे.. असं त्यांना वाटत नाही. त्यामुळे आता त्या तृप्त आहेत. अत्यंत समाधानाने म्हणत असतात, 'आता कधीही बोलवणं येऊ दे, मी तयार आहे.'

सेवेचं हे जगावेगळं शिवधनुष्य हसत हसत उचलणाऱ्या लक्ष्मीच्या मनाला आता एक विलक्षण आस लागलीय... आपल्या रामलक्ष्मणांनी मानवतेच्या कल्याणासाठी झटावं.. दुर्धर विशेषत: कॅन्सरसारख्या रोगांवर खात्रीचं औषध शोधून काढावं... असं तिला तीव्रतेनं वाटतं. मोठ्या मनाची लक्ष्मी देवापाशी यापेक्षा दुसरं अधिक काय मागू शकते?

- **संपदा वागळे**, ठाणे

भ्रमणध्वनी : ९९३०६८७५१२

मध्यमवर्गीयांसाठी डिलक्स सहली
राजगुरू टुर्स
जिव्हाळा जपणारी माणसं
उत्तम हॉटेल्स, AC बस, रेल्वे-विमानप्रवासासह
केरळ - बॅकवॉटर्स 16,975/-
केरळ - कन्याकुमारी-रामेश्वर - मदुराईसह 21,975/-
२५ डिसें., १५ जाने., २७ फेब्रु.
केरळ - महिला स्पेशल (थोड्याच जागा)
त्रिचूर - हॉटेल लुसिया कोचिन-हॉटेल दरबार
पेरीयार वुडलॅंड प्राइम कन्याकुमारी-सिंगार रेजन्सी
• सौराष्ट्र • हैद्राबाद • राजस्थान
ज्येष्ठ नागरीक, ग्रुप्सना सवलत
दादर : 24318082 / 24381026

## आरती भ्रष्टाचाराची

जयदेव जयदेव जय भ्रष्टाचारा
गल्ली ते दिल्लीत तुमचा दरारा ।।ध्रु।।

शालेय पोषण आहार घोटाळा
रोहयो - अनुदान - चारा घोटाळा
वृद्धापकाळी पेन्शन घोटाळा
'आदर्श' घोटाळा - आला कंटाळा।।१।।

प्लॉटपासून फ्लॅटपर्यंत
मिळकतीला नाही राहिला अंत
लाचखोरीची कोणा ना खंत
कालचा रंक तो आज श्रीमंत।।२।।

प्रामाणिक माणूस निर्भय ना बनला
लबाड मात्र तो धाडसी बनला
शेतकरी कष्ट करीत मेला
पुढारी तो भ्रष्ट होऊन जगला ।।३।।

मंत्र्यांना शिस्त ना पोलिसा शिस्त
सनदीही गब्बर होण्यात व्यस्त
न्यायमूर्ती काही घोटाळेग्रस्त
'विदेश' मनांत होतसे त्रस्त ।।४।।

- **व्ही. व्ही. देशपांडे**, सोलापूर

मो. - ९०११६६७१२७

## वेदना

विरल दन्तो न मे दु:खम् ।
त मे दु:खम् श्वेतकेशो दंडोपिव ।
न मे दु:खम् युवा करोती टिंगलम् ।
एतद् एव महत दु:खम् ।
युवती बदती अंकलम् ।।

माझ्या दातांना फटी पडल्या आहेत त्याचे मला दु:ख नाही. माझे केस पांढरे झाले आहेत. हातात काठी आली आहे त्याचेही मला वाईट वाटत नाही. तरुण मुले माझी टिंगल करताहेत त्याचे मला दु:ख नाही. परंतु जेव्हा तरुणी मला अंकल म्हणून हाक मारतात तेव्हा मला फार वेदना होतात.

- **गोपाळ मुळे**, सावेडी (नगर)

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at R.M.S., Pune Railway Station on 25th of each Month

## आयुष्य एक तडजोड

आयुष्यात काही गोष्टी कशा राहूनच जातात ।
ठरविल्या तरी त्या झालेल्या नसतात ॥
सगळे कसे हे आठवून जाते आयुष्याच्या सायंकाळी ।
पण 'बीते हुए दिन' परतणारे नसतात ॥
प्रत्येकाने आयुष्याची रूपरेखा आखलेली असते ।
पण मनासारख्या गोष्टी क्वचितच घडत असतात ॥
कुणाला पत्नी मिळते सुंदर, मनासारखी ।
पण स्वभावाला तिच्या, बोचरे काटेच असतात ॥
वाटत असते मुलाने डॉक्टर व्हावे, इंजिनिअर व्हावे ।
पण मुलाला त्या गोष्टी मान्यच नसतात ॥
अपेक्षांचे ओझे असे मग वाढतच जाते ।
सगळ्या ठिकाणी मग तडजोडीच कराव्या लागतात ॥
तरीदेखील मनुष्य त्यात समाधान मानत असतो ।
घडणाऱ्या गोष्टी कुठे माणसाच्या हातात असतात? ॥

- **रमेश गिं. इंगोलीकर**, अमरावती
दूरध्वनी : ०७२१-२६७१८८७

## Balance Sheet of Life

Our Birth is our opening Balance
Our Death is our closing Balance
Our creative ideas are our assets
The Heart is our current asset
The Brain is our fixed deposit
Achievements are our capital
Curators are our stocks in trade
Friends are our general resource
Values and behaviours are our good-will
Wants are our dividends
Childrens are our bonus issues
Knowledge is our investment
Experience is our premium
The life is totally the Balance-Sheet

- **Madanlal Kabra,** Jalgaon
Mob.: 9730550410

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.